❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २६४ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारितेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# मनोज जरांगेंचं उपोषण स्थगित

■ मुंबई (दै. संध्या)

मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. सरकारच्या शिष्टमंडळाच्या भेटीनंतर मनोज जरांगेंनी 90 दिवसांसाठी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला. तसेच उपोषण स्थगित केलंय, मात्र आंदोलन सुरुच राहणार, असं मनोज जरांगेंनी स्पष्ट केलं. मनोज जरांगे यांनी सरकारला 90 दिवसांची मुदत दिली आहे. जीआर काढून गॅझेटियरची अंमलबजावणी करावी. 58 लाख नोंदींमधील एकही नोंद कमी व्हायला नको... नोंदी कमी करणार नाही, याची लेखी हमी द्यावी, अशी मागणी मनोज जरांगेंनी केली. जर सरकारने धोका दिला, तर आम्ही मुंबई गाठणार, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला. तसंच मुंबईत गेलेल्या 1 लाख 07 हजार समर्थकांनी माघारी यावं असं आवाहन देखील मनोज जरांगेंनी केलं आहे.

मनोज जरांगेंनी उपोषण स्थगित केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिली प्रतिक्रिया दिली. मनोज जरांगेंनी उपोषण स्थगित केल्याचा मला आनंद आहे. मनोज जरांगेंच्या 13 मागण्यांपैकी 12 मागण्या आम्ही मान्य केल्या होत्या. एका मागणीबाबत आम्ही त्यांना कायदेशीर अडचणी सांगितल्या होत्या. त्यामुळे आम्ही ज्या मागण्या मान्य केल्या आहेत, समितीने जे काही आश्वसनं दिली आहेत, ते सर्व आम्ही पूर्ण करु,





असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच आमचे निर्णय आधीच झाले आहेत, काही प्रशासकीय अडचणी आहेत, त्या दूर करायच्या आहे, तेही आम्ही करु... सरकार नेहमीच सकारात्मक राहिलंय. आमचे दरवाजे नेहमी उघडे आहेत. मराठा समाजासाठी मी आणि एकनाथ शिंदे यांनी निर्णय घेतले, तेवढे निर्णय कधीच कोणी घेतले नाही. मराठा समाजाला जे काही मिळालं, ते आमच्या काळात मिळालेलं आहे, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले. आता कुठल्याही सणामध्ये विघ्न न येता, आज हे उपोषण स्थगित झालंय, याचा मला आनंद आहे, असंही देवेंद्र फडणवीसांनी सांगितले. आज सकाळी 5 वाजता सरकारचं शिष्टमंडळ मनोज जरांगेंच्या भेटीसाठी बीडमधील पाटोदा येथे दाखल झालं होतं. यामध्ये मंत्री राधाकृष्ण विखे, मंत्री दादा भुसे, आमदार प्रसाद लाड, आमदार सुरेश धस यांचा समावेश होता. जवळपास 1.30 तास मनोज जरांगे आणि सरकारच्या शिष्टमंडळ यांच्यात चर्चा

### सरकारने कोणती हमी दिली?

- सातारा, कोल्हापूर, पुणे, औंधचं गॅझेट तीन महिन्यांत जीआर काढून लागू करु
- हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्रे देण्यासाठी सुधारीत जीआर काढू
- हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्रांना वैधता देणं चालूच राहील
- शिंदे समितीस मिळालेल्या 58 लाख नोंदी घटवणार नाही
- मराठवाडयातील 4 लोकप्रतिनिधींची रद्द केलेली कुणबी प्रमाणपत्रे वैध करु

झाली. यावेळी मनोज जरांगे यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. मराठा समाजाला खुन्नस देणं चांगलं नाही. चर्चा न करणारे आज चर्चेसाठी आले की नाही?, आरक्षणापेक्षा समाजाची इज्जत महत्वाची आहे, असं मनोज जरांगे म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे माझे वैरी नाहीत. पण समोरुन वार आलं, तर काय करणार?, असा सवालही मनोज जरांगेंनी उपस्थित केला. तसेच राधाकृष्ण विखे चुकत असले तरी त्यांच्यावर प्रेम करा. एकनाथ शिंदेंवरही प्रेम करु पण आता नाही. मंत्र्यांनी टीका केली तर आम्ही गप्प बसणार नाही, असंही मनोज जरांगेंनी स्पष्ट केलं.

## भारतीय इंजिनीअरचा अमेरिकेत गूढ अंत; लग्नानंतर १७ दिवसांनी मृत्यू


■ वॉशिंग्टन (दै. संध्या)

भारतीय सिव्हिल इंजिनीअरचा अमेरिकेत संशयास्पद स्थितीत मृत्यू झाला. लग्नानंतर अवघ्या १७ दिवसांनी इंजिनीअरची प्राणज्योत मालवली. मोहम्मद जाबेर हुसेन असं मृत इंजिनीअरचं नाव आहे. तो मूळचा हैदराबादचा रहिवासी होता. हुसेनच्या अकस्मात मृत्यूनं त्याच्या कुटुंबाला जबर धक्का बसला आहे.

मोहम्मद जाबेर हुसेन अमेरिकेच्या मॅसाचुसेट्स राज्यातील लोवेल भागात राहायचा. तो एका कंपनीत काम करायचा. मोहम्मद हुसेनच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती बेताची आहे. त्यामुळे मोहम्मदचं पार्थिव मायदेशी आणताना त्यांना अडचणींचा सामना करावा लागणार आहे. यासाठी कुटुंबियांनी केंद्र सरकारकडे मदत मागितली आहे.

मोहम्मद जाबेर हुसैनचे वडील मोहम्मद झाकिर हुसैन यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या लेकाचं लग्न २८ ऑगस्टला टेक्सासमध्ये झालं होतं. लग्नानंतर जाबेर पुन्हा मॅसाचुसेट्सला परतला. तो तिथेच राहायचा आणि सिव्हिल इंजिनीअर म्हणून काम करायचा. त्याची पत्नीदेखील त्याच्या सोबत मॅसाचुसेट्सला परतली होती, याबद्दल अद्याप नेमकी माहिती उपलब्ध नाही. लग्नानंतर अवघ्या काही दिवसांत जाबेरचा अकाली मृत्यू झाल्यानं कुटुंबाला धक्का बसला आहे. कुटुंबानं दिलेल्या माहितीनुसार, जाबेरचा परिवाराशी १४ सप्टेंबरला अखेरचा संवाद झाला होता. त्यानंतर

### कुटुंबाचं केंद्र सरकारला पत्र



जवळपास ८ तासांनी त्याच्या मित्राचा कॉल आला. जाबेरचा झोपेतच मृत्यू झाल्याचं त्यानं सांगितलं. जाबेरचा मृत्यू कोणत्या स्थितीत झाला, याबद्दल त्याच्या कुटुंबाला स्पष्ट माहिती नाही. जाबेरला तातडीनं वैद्यकीय मदत देण्यात आली होती का, हा प्रश्नदेखील अनुत्तरित आहे. जाबेरचा मृत्यू कोणत्या परिस्थितीत झाला याची माहिती शवविच्छेदन अहवालातून मिळेल. त्यामुळे जाबेरचं कुटुंब शवविच्छेदन आणि वैद्यकीय अहवालाची वाट पाहात आहे. अहवालातून अनुत्तरित प्रश्नांची उत्तरं मिळतील, अशी आशा कुटुंबाला आहे.

## थोडक्यात...

### प्रवेशाची प्रक्रिया तांत्रिक अडचणींमुळे ठप्प

पुणे : दैनिक संध्या

"माझ्या मुलाचा पुण्यात नंबर लागला, महाविद्यालय देखील सुरू झालं. पण राहायला वसतिगृहच नाही. आम्ही शेतमजूर, शहरातल्या खासगी रूमचं हजारो रुपयांचं भाडं कुठून भरणार? महिनाभरापासून समाजकल्याण कार्यालयाचे उंबरे झिजवतोय, पण 'पोर्टल लवकरच सुरू होईल' यापलीकडे अधिकारी काहीच सांगत नाहीत. निवाराच नसल्याने मुलाला घरीच बसवून ठेवण्याची वेळ आमच्यावर आली आहे." अहिल्यानगरचे हतबल पालक सुनील साळुंके यांची ही उद्विग्न प्रतिक्रिया प्रशासनाच्या गलथान कारभारावर सणसणीत चपराक ओढणारी आहे. महाविद्यालयांचे नवीन शैक्षणिक सत्र सुरू होऊन महिना उलटला, तरी 'महाआयटी'च्या पोर्टलवरील तांत्रिक घोळामुळे समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहांना अद्याप कुलूपच आहे. समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहांमध्ये प्रवेश मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना 'महाआयटी'च्या संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज करावा लागतो. मात्र, नवीन नोंदणी करताना आधार क्रमांकाशी संलग्न असलेल्या दुरध्वनी क्रमांकावर 'ओटीपी'च येत नाही. केंद्रीय आधार यंत्रणेच्या सर्व्हरमधील या तांत्रिक त्रुटीमुळे नोंदणीची पुढील प्रक्रिया ठप्प झाली आहे. पर्यायाने हजारो विद्यार्थ्यांना अर्जच करता येत नाही. त्यामुळे परजिल्ह्यांतून पुण्यात शिक्षणासाठी आलेल्या गरजू विद्यार्थ्यांसमोर राहण्या-खाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या समस्येबाबत समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळाला नाही.

### दहावी-बारावी परीक्षांच्या तारखा जाहीर

पुणे : दैनिक संध्या

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२७मध्ये होणारी बारावीची परीक्षा आठ फेब्रुवारीपासून, तर दहावीची परीक्षा १५ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. दहावी-बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षा आणि लेखी परीक्षांचे विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहे. राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या लेखी, प्रात्यक्षिक, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षांचा कालावधी जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार, बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १६ मार्च दरम्यान होणार आहे. तर प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षा २० जानेवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान होईल. तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते ११ मार्च दरम्यान होणार आहे.

## व्यसनाधीनतेविरुद्ध लढा राष्ट्रव्यापी करणे आवश्यक – राज्यपाल जिष्णु देव वर्मा



■ मुंबई (दै. संध्या)

अंमली पदार्थ घेऊन जगणे हे काही जीवन नाही. 'ड्रग इज नॉट कुल, इट्स क्रुएल'. व्यसनाधीन व्यक्तीला मदत करणे म्हणजे त्याच्या जीवनात लुडबुड करणे असे नसून ती त्याला मदत करणे आहे. व्यसनाधीन व्यक्तीशी आपला संबंध नाही; सबब त्याला वाटते तसे जगू द्यावे, अशी स्वार्थी भूमिका घेऊ नये असे सांगताना अंमली पदार्थाच्या आहारी गेलेल्या व्यक्तीला मदत करण्यासाठी युवक व विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. व्यसनाधीनतेचे गंभीर आवाहन विचारात घेता त्याविरुद्ध लढा राष्ट्रव्यापी करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सुरु असलेल्या सेवा संकल्प अभियानांतर्गत राज्यपालांनी एचएसएनसी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना व्यसन मुक्तीची प्रतिज्ञा दिली, त्यावेळी ते बोलत होते. के. सी. महाविद्यालयाचे सभागृह तसेच ओव्हल मैदान येथे झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी हात उंचावून व्यसनमुक्तीची तसेच व्यसनमुक्त भारताच्या निर्मितीसाठी आपले योगदान देण्याची प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाचे आयोजन एचएसएनसी विद्यापीठाने पंडित दीनदयाल उपाध्याय सेवाभावी ट्रस्ट, नांदेड व मेघाश्रय फाउंडेशन यांच्या सहकार्याने केले होते. समाजातील वाढत्या अंमली पदार्थाच्या व्यसनाधीनतेच्या समस्येला मागणी व पुरवठा अशा दोन बाजू आहेत. पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस व इतर शासकीय यंत्रणा कार्य करीत आहेत. परंतु मागणी होऊ नये याकरिता समाजात मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

## अजय बारसकरांचा मनोज जरांगेंवर घणाघात

■ मुंबई (दै. संध्या)

मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. सरकारच्या शिष्टमंडळाच्या भेटीनंतर मनोज जरांगेंनी 90 दिवसांसाठी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला. तसेच उपोषण स्थगित केलं. मात्र आंदोलन सुरुच राहणार, असं मनोज जरांगेंनी स्पष्ट केलं. मनोज जरांगे यांनी सरकारला 90 दिवसांची मुदत दिली आहे. जीआर काढून गॅझेटियरची अंमलबजावणी करावी. 58 लाख नोंदींमधील एकही नोंद कमी व्हायला नको... नोंदी कमी करणार नाही, याची लेखी हमी द्यावी, अशी मागणी मनोज जरांगेंनी केली. जर सरकारने धोका दिला, तर आम्ही मुंबई गाठणार, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला.

मनोज जरांगे यांनी उपोषण स्थगित केल्यानंतर मराठा आरक्षण अभ्यासक अजय महाराज बारसकर यांनी हल्लाबोल केला आहे. 20 दिवसानंतर उपोषण नाट्य संपलं. अंतरवाली सराटीच्या सरपंच यांचा मुलगा आणि कंत्राटदार यांनी मिळून राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासोबत सेटिंग केली. आंदोलनाचं नेतृत्व बुद्धीहीन माणसाकडं पाहिजे. मनोज जरांगे हा कुटील, कपटी माणूस आहे. मराठा समाज नाही, तर मनोज जरांगे यांचा अहंकार जिंकला, अशी टीका अजय बारसकर यांनी केली. वाळू माफिया आणि ED चौकशी यांच्यावर सेटिंग



झाली. आता ED चौकशी होणार नाही. मनोज जरांगे यांचा लढा सोबतच्या लोकांना राजकारणात आणण्यासाठी आहे. मनोज जारंगे ब्रह्मराक्षक बनून आपल्या डोक्यावर बसलाय. मनोज जरांगे भाजपचं पाळीव कुत्रं आहे, असा घणाघातही अजय बारसकर यांनी केला.

मनोज जरांगेला मोठं करण्यात भाजप सरकारचा मोठा हात आहे. मंत्री दादा भुसे यांचं अभिनंदन करतो. दादा भुसेंनी सांगितलं की, मुद्द्यावर बोला. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवारांनी सांगितलं आहे की, अंधारातून सरकार यांना वेगळं देत आहे. 1400 कोटी रुपयांच्या टेंडरमुळे, बलांडे यांना दिले का? हे राधाकृष्ण विखे पाटलांनी सांगावं, असंही अजय बारसकर यांनी सांगितलं. मनोज जरांगेचं आंदोलन स्वतःच्या लेकराबाळांसाठी आहे. मुख्य प्रश्नावरून लक्ष हटवण्यासाठी मनोज जरांगे यांचं आंदोलन आहे, असा आरोपही अजय बारसकरांनी केला. मनोज जरांगे यांचा मुंबई दौरा रद्द होण्यामागे, बंद खोलीतील सेटलमेंट हे यामागचं कारण आहे. पांडुरंग तारक यांच्याकडे ड्राफ्ट देतो म्हणाले. पांडुरंग तारक यांचा अभ्यास काय आहे?, असा सवालही अजय बारसकर यांनी उपस्थित केला. आता ED ची चौकशी बंद करण्यासाठी लाभार्थी टोळीने सेटलमेंट केली. चोरी करणारा अत्यंत सावधगिरीने चोरी करतो. मनोज जरांगे लोकांना वेड्यात काढत आहे. मनोज जरांगे आणि त्याच्या साथीदारांना फायदा होतोय, असा दावाही अजय बारसकर यांनी केला.

मनोज जरांगे यांची पहिली स्क्रिप्ट बारामतीहून आली. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची स्क्रिप्ट होती. आता एकनाथ शिंदेंना शिव्या देत आहेत. आता तुम्ही विखे पाटलांवर प्रेम करा म्हणतात. त्यामुळं यामागे विखे सूत्रधार असावेत, असंही अजय बारसकर म्हणाले. सरकार मनोज जरांगेंना वापरून घेत आहे. मराठा आणि ओबीसी समाजात मनोज जरांगे तेढ निर्माण करत आहे. मनोज जरांगेंना ऑस्कर पुरस्कार द्यावा. राधाकृष्ण विखेंनी कोलमडलेल्या मनोज जरंगेंना काय पाजलं? मनोज जरांगेंना आज अचानक तरतरी कुठून आली? असा सवालही अजय बारसकरांनी उपस्थित केला.

## वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्यसेवेत राज्याची मोठी झेप

### *मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानंतर 'सहयोगी व आरोग्यसेवा परिषद स्थापनेच्या कार्यवाहीला गती*

■ मुंबई (दै. संध्या)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानंतर आता 'महाराष्ट्र राज्य सहयोगी व आरोग्यसेवा परिषदे'च्या स्थापनेला आणि तिच्या प्रभावी अंमलबजावणीला मोठी गती देण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील आरोग्यसेवा व्यावसायिकांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि नियमन अधिक सक्षम व जागतिक दर्जाचे होणार आहे. राज्यातील वैद्यकीय शिक्षण क्षेत्राला अधिक दर्जेदार आणि प्रगत बनविण्याच्या दिशेने हा निर्णय महत्वपूर्ण ठरणार आहे. राज्यातील सहयोगी व आरोग्यसेवा व्यावसायिकांसाठी उत्तम दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने १० ऑक्टोबर २०२४ रोजी या परिषदेच्या स्थापनेची अधिसूचना निर्गमित करण्यात आली होती. तसेच, या परिषदेचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी आवश्यक नियमावलीही तयार करण्यात आली आहे. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, राष्ट्रीय स्तरावरील अद्ययावत अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्याच्या दृष्टीने वेगाने पावले उचलली जात आहेत. यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय दर्जाचे शिक्षण आणि प्रशिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आरोग्यसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी आणि कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी या परिषदेअंतर्गत चार महत्त्वपूर्ण स्वायत्त मंडळांची स्थापना केली जाणार आहे.



पदवीपूर्व सहयोगी व आरोग्यसेवा शिक्षण मंडळ, पदव्युत्तर सहयोगी व आरोग्यसेवा शिक्षण मंडळ, सहयोगी व आरोग्यसेवा व्यवसाय मूल्यांकन व मानांकन मंडळ आणि सहयोगी व आरोग्यसेवा व्यवसाय आचारसंहिता व नोंदणी मंडळांची स्थापना करण्यात येणार आहे. सध्या या व्यावसायिकांच्या नोंदणी प्रक्रियेबाबत केंद्राच्या मार्गदर्शक तत्वांच्या मान्यतेची प्रक्रिया पूर्ण झाली असून ३१ ऑगस्ट २०२६ रोजी याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे. यामुळे पुढील कार्यवाही सुरू करण्यासाठी राज्य शासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. महाराष्ट्रात फिजिओथेरपिस्ट, रेडियोग्राफर, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, नेत्रतज्ज्ञ, आहारतज्ज्ञ आणि इतर ५० हून अधिक विषयांचे मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण घेता येणार आहे. याचीही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित यंत्रणांमध्ये योग्य समन्वय साधून या परिषदेचे कामकाज अधिक प्रभावीपणे राबविण्यावर भर दिला जात आहे. या ऐतिहासिक कार्यवाहीमुळे राज्याच्या सहयोगी व आरोग्यसेवा क्षेत्रात दर्जेदार व्यावसायिक मानके, उत्तम आचारसंहिता, योग्य मूल्यांकन आणि एक अत्यंत सक्षम व उत्तरदायी व्यवस्था निर्माण होण्यास मोठी चालना मिळणार आहे. भविष्यात राज्याच्या आरोग्य व्यवस्थेसाठी आणि रुग्णांच्या सेवेसाठी हा निर्णय एक मोठा मैलाचा दगड ठरणार आहे.

## शोककळा : लेखकाचे अपघाती निधन

■ मुंबई (दै. संध्या)

मराठी प्रेक्षकांचं खळखळून मनोरंजन करणाऱ्या आणि महाराष्ट्राला सातत्याने हसवत प्रेक्षकांच्या मनात घर करुन बसलेल्या महाराष्ट्राची हास्यजत्रा कार्यक्रमाच्या टीमवर शोककळा पसरली आहे. हास्यजत्रा कार्यक्रमातील कलाकारांवर महाराष्ट्रातील प्रेक्षक मनापासून प्रेम करतात. मात्र, टीव्हीवर न दिसणाऱ्या कित्येक कलाकारांचं देखील या कार्यक्रमात तेवढंच महत्त्वाचं योगदान आहे. या मनोरंजनात्मक कार्यक्रमातील पडद्यामागचा कलाकार असलेल्या लेखक विजय कुमार राख यांचे अपघाती निधन झाले आहे. याबाबत, लेखन टीममधील सचिन गोस्वामी यांनीच माहिती दिली. हास्यजत्रेच्या सृजन टीममधील लेखक विजय कुमार राख यांचे रात्री एका अपघातात निधन झाले. विजय कुमार विनोदाची उत्तम जाण असणारे आणि ग्रामीण जीवनाचे बारकावे हेरणारे मराठवाड्यातील एक होतकरू लेखक होते. ऐन तारुण्यात त्यांचे जाणे हे कलाक्षेत्र, हास्यजत्रा टीम आणि त्यांच्या मित्रपरिवारासाठी मोठा धक्का आहे. हास्य जत्रा टीम त्यांच्या कुटुंबियांच्या वेदनेत सहभागी आहे. विजयकुमार याना भावपूर्ण श्रद्धांजली, असे फेसबुक पोस्ट सचिन गोस्वामी यांनी पोस्ट केली आहे. गोस्वामी यांच्या पोस्टवर अनेकांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत. महाराष्ट्राची हास्यजत्रा ही मनोरंजनात्मक मालिका सोनी टीव्हीवर प्रदर्शित होत असून प्रेक्षकांना खळखळून हसवण्याचं काम यातील कलाकार करतात. अभिनेता प्रसाद ओक, अभिनेत्री सई ताम्हणकर, अभिनेत्री प्राजक्त माळी, समीर चौगुले यांच्यासह अनेक दिग्गज कलाकार या कार्यक्रमातून प्रेक्षकांचे मनोरंजन करतात.

# संपादकीय

## आरक्षणाची न सुटलेली गाठ

मध्यरात्रीचे आवाहन, मुंबईकडे निघालेला मोर्चा आणि मुलांच्या भवितव्यासाठी आरक्षणाची मागणी मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाने महाराष्ट्राच्या सामाजिक प्रश्नाला पुन्हा एकदा देशाच्या चर्चेच्या केंद्रस्थानी आणले आहे. पण हा संघर्ष केवळ जरांगे विरुद्ध सरकार एवढ्यापुरता मर्यादित नाही. त्याच्या मुळाशी शिक्षण, रोजगार, सामाजिक प्रतिनिधित्व, आर्थिक असुरक्षितता आणि समान संधीचा प्रश्न आहे. म्हणूनच 'आरक्षणाची न सुटलेली गाठ' सोडवताना भावनेइतकाच इतिहास, आंदोलनाइतकीच घटना आणि राजकीय घोषणेइतकाच न्यायालयीन कसोटीचा विचार करावा लागणार आहे. भारतामध्ये सामाजिक न्यायाची ही वाटचाल कालची नाही. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षण आणि सामाजिक प्रतिनिधित्वाला विषमतेवर मात करण्याचे साधन मानले. छत्रपती शाहू महाराजांनी १९०२ मध्ये कोल्हापूर संस्थानात मागास घटकांसाठी आरक्षणाची व्यवस्था करून सामाजिक प्रतिनिधित्वाला संस्थात्मक रूप दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून समानता, संधी आणि सामाजिक न्याय यांना लोकशाहीच्या केंद्रस्थानी आणले. त्यामुळे भारतातील आरक्षण ही केवळ नोकरीतील जागांची गणिती विभागणी नसून ऐतिहासिक विषमतेवर घटनात्मक हस्तक्षेप करण्याची प्रक्रिया आहे. स्वातंत्र्यानंतरही हा प्रश्न संपला नाही. १९७९ मध्ये स्थापन झालेल्या मंडल आयोगाने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गांच्या स्थितीचा अभ्यास करून केंद्र सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणातील प्रतिनिधित्वाचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर पुढे आणला. १९९०च्या दशकात मंडल आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीने देशात तीव्र सामाजिक आणि राजकीय प्रतिक्रिया उमटल्या. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या इंद्रा साहनी निकालाने आरक्षणाच्या घटनात्मक चौकटीवर महत्त्वाचे निकष निश्चित केले. म्हणजेच भारताने आरक्षणाचा मार्ग स्वीकारला; पण त्याला संविधान आणि न्यायालयीन परीक्षणाची चौकटही दिली. मराठा आरक्षणाचा प्रश्न याच दीर्घ इतिहासातील पुढचे पर्व आहे. महाराष्ट्रात मागणीला विविध टप्प्यांवर राजकीय आणि सामाजिक स्वरूप मिळाले. २०१८ मध्ये राज्याने मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी कायदा केला; त्यावर न्यायालयीन आव्हान झाले. २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने हा कायदा रद्द केला आणि आरक्षणाच्या मर्यादा तसेच अपवादात्मक परिस्थितीच्या घटनात्मक निकषांवर महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली. त्यामुळे आंदोलनाचा प्रश्न रस्त्यावर असला तरी त्याचे अंतिम उत्तर न्यायालयीन आणि घटनात्मक चौकटीपासून वेगळे होऊ शकत नाही. २०२४ मध्ये महाराष्ट्राने पुन्हा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाच्या चौकटीत मराठा समाजासाठी १० टक्के आरक्षणाचा कायदा केला. या आरक्षणाची रचना विद्यमान आरक्षणाच्या वर अतिरिक्त स्वरूपात करण्यात आली असून त्याची घटनात्मक वैधता न्यायालयीन परीक्षणाच्या केंद्रस्थानी आहे. त्यामुळे सरकार कायदा करू शकते; आंदोलन दबाव निर्माण करू शकते; पण आरक्षण टिकविण्यासाठी घटनात्मक कसोटी पार करावीच लागते ही या प्रश्नाची मूलभूत वस्तुस्थिती आहे. जरांगे यांच्या आंदोलनाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे त्यांनी आरक्षणाचा प्रश्न पुन्हा ग्रामीण महाराष्ट्रातील कुटुंबांच्या दैनंदिन चिंतेशी जोडला आहे. शिक्षणाचा खर्च वाढत आहे, सरकारी नोकऱ्यांची संख्या मर्यादित आहे, स्पर्धा तीव्र आहे आणि तरुणांच्या भवितव्याबद्दल असुरक्षितता वाढत आहे, अशी भावना त्यांच्या आंदोलनाच्या केंद्रस्थानी आहे. कुणबी नोंदींच्या आधारे पात्र मराठ्यांना ओबीसी आरक्षणाचा लाभ देण्याची मागणी हा त्यांच्या आंदोलनाचा महत्त्वाचा भाग आहे. सध्याच्या आंदोलनात मुंबईकडे कूच करण्याचा निर्णय आणि परवानगीबाबत प्रशासनाशी निर्माण झालेला तणाव यामुळे प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पण प्रशासनाचीही कसोटी कमी नाही. गणेशोत्सवासारख्या मोठ्या सार्वजनिक उत्सवाच्या काळात मुंबईकडे मोठ्या संख्येने आंदोलनकर्ते येत असताना वाहतूक, नागरिकांची सुरक्षितता, सार्वजनिक सुव्यवस्था आणि आंदोलनाचा घटनात्मक अधिकार यांचा समतोल राखावा लागतो. सरकारच्या म्हणण्यानुसार जर काही मागण्या मान्य झाल्या असतील आणि काही मागण्या न्यायप्रविष्ट असतील, तर त्या निर्णयांची स्पष्ट माहिती आंदोलनकर्त्यांसमोर ठेवणेही प्रशासनाची जबाबदारी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १४ पैकी १२ मागण्या मान्य झाल्याचे म्हटले आहे; हा सरकारचा दावा असून जरांगे यांची भूमिका त्यापेक्षा वेगळी आहे. जगाच्या इतिहासातही सामाजिक विषमता कमी करण्यासाठी विविध देशांनी वेगवेगळ्या affirmative action धोरणांचा अवलंब केला आहे. अमेरिकेत वांशिक आणि ऐतिहासिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर affirmative actionची दीर्घ परंपरा राहिली; दक्षिण आफ्रिकेत वर्णद्वेषाच्या वारशातून बाहेर पडताना प्रतिनिधित्व आणि संधीच्या प्रश्नांसाठी वेगळी धोरणात्मक चौकट विकसित झाली. भारताचा अनुभव मात्र स्वतंत्र आहे. येथे जात, सामाजिक मागासलेपणा, अस्पृश्यतेचा इतिहास आणि घटनात्मक समानता यांचा गुंता असल्यामुळे भारतीय आरक्षणव्यवस्था इतर देशांची सरळ नक्कल होऊ शकत नाही. इतिहासाचा आणखी एक धडा महत्त्वाचा आहे. कोणतेही सामाजिक आंदोलन केवळ घोषणांनी संपत नाही. अमेरिकेतील नागरी हक्क चळवळ असो किंवा दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदविरोधी संघर्ष दीर्घकाळ चाललेल्या संघर्षांना अखेरीस संस्थात्मक धोरण, कायदे आणि सामाजिक स्वीकाराची जोड मिळाली. भारतातील मंडलनंतरची वाटचालही हेच दाखवते. रस्त्यावरचा दबाव आवश्यक असू शकतो; परंतु त्याचे रूपांतर टिकाऊ सार्वजनिक धोरणात झाले तरच त्याचा दीर्घकालीन परिणाम दिसतो. म्हणून जरांगे यांच्या कणखर भूमिकेकडे केवळ राजकीय चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही; त्याचप्रमाणे आंदोलनातील प्रत्येक मागणीला घटनात्मक तपासणीपासून मुक्त मानणेही योग्य नाही. मराठा समाजाच्या सामाजिक-आर्थिक प्रश्नांकडे गांभीर्याने पाहतानाच ओबीसी समाजाच्या विद्यमान हक्कांबाबत निर्माण होणाऱ्या चिंतांनाही समान संवेदनशीलतेने हाताळणे आवश्यक आहे. एका घटकाला न्याय देताना दुसऱ्या घटकाला अन्याय झाल्याची भावना निर्माण होणार नाही, अशी पारदर्शक आणि पुराव्यावर आधारित प्रक्रिया हीच प्रशासनाची खरी परीक्षा आहे. आजचा प्रश्न 'मुंबईत मोर्चा होणार की नाही?' एवढाच नाही. त्यापुढचा प्रश्न आहे आरक्षणाची मागणी किती काळ आंदोलनांच्या फेऱ्यात फिरत राहणार आणि तिचे घटनात्मक, कायदेशीर व सामाजिक उत्तर कधी तयार होणार? समित्या येतील, अहवाल येतील, कायदे केले जातील, न्यायालयीन आव्हाने उभी राहतील; पण प्रत्येक पिढीतील तरुणाला पुन्हा त्याच प्रश्नासाठी रस्त्यावर उतरावे लागू नये, अशी व्यवस्था उभी करणे हे राज्यकर्ते आणि प्रशासन यांचे मोठे उत्तरदायित्व आहे. मराठा आरक्षणाची गाठ केवळ राजकीय इच्छाशक्तीने सुटणार नाही. तिच्यासाठी ऐतिहासिक नोंदी, अद्ययावत सामाजिक-आर्थिक आकडेवारी, घटनात्मक तरतुदी, न्यायालयीन निकष, पारदर्शक पात्रता आणि सर्व संबंधित समाजघटकांशी संवाद या सगळ्यांची सांगड घालावी लागेल. जरांगे यांचा कणखर आवाज ही या अस्वस्थतेची अभिव्यक्ती आहे; प्रशासनाची खरी कसोटी त्या आवाजाला केवळ बंदोबस्ताने उत्तर देण्यात नाही, तर न्याय, संविधान आणि विश्वास यांच्या आधारावर टिकाऊ उत्तर उभे करण्यात आहे. आरक्षणाची गाठ जितकी सामाजिक आहे तितकीच ती घटनात्मक आहे. त्यामुळे तिचा धागा रस्त्यावरच्या आंदोलनातून निघाला तरी त्याचा शेवट न्याय्य, पारदर्शक आणि कायदेशीर तोडग्यातच व्हायला हवा. मोर्चे थांबतील, सरकारे बदलतील, चेहरे बदलतील; पण सामाजिक न्यायाचा प्रश्न सुटला नाही तर 'आरक्षणाची न सुटलेली गाठ' पुन्हा पुन्हा घट्ट होत राहील.

# विद्यार्थ्यांकडून अनोखा सन्मान!

■ पुणे (दै. संध्या)



पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या वतीने विद्यार्थ्यांनी गुरुवारी (ता.१७) महापालिका भवन कार्यालयात जाऊन त्यांचा अनोख्या पद्धतीने सन्मान केला. विद्यार्थ्यांनी आयुक्तांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत स्वतः तयार केलेली ग्रीटिंग कार्ड्स भेट दिली. विद्यार्थ्यांच्या या आपुलकीच्या उपक्रमामुळे आयुक्त नवल किशोर राम भावूक झाले.

चलवादी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी यावेळी आयुक्तांचा शाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथ आणि भारतीय संविधानाची प्रत देऊन सन्मान केला व त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी केलेल्या सत्काराचे आयुक्तांनी विशेष कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधत त्यांच्या आवडी-निवडी, शिक्षण आणि भविष्यातील ध्येयांबाबत गप्पा मारल्या. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी पुणे महानगरपालिकेच्या सभागृहालाही भेट दिली. महापालिकेचे कामकाज कशा पद्धतीने चालते, सभागृहातील बैठका, निर्णयप्रक्रिया आणि स्थानिक स्वराज्य संस्थेची भूमिका याबाबत विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. त्यामुळे पुस्तकातील नागरी प्रशासनाचा अभ्यास प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली.

महापालिका ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित असलेली महत्त्वाची संस्था आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातून नव्हे, तर प्रत्यक्ष प्रशासकीय यंत्रणेला भेट देऊन स्थानिक स्वराज्य व्यवस्थेची माहिती मिळणे हा या उपक्रमाचा विशेष शैक्षणिक पैलू ठरला. विद्यार्थ्यांना लोकशाही, संविधान आणि जबाबदार नागरिकत्वाची जाणीव करून देण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले.

विद्यार्थ्यांना केवळ वर्गातील शिक्षण न देता त्यांना प्रत्यक्ष प्रशासकीय व्यवस्था आणि लोकशाही संस्थांची ओळख करून देणारा पुणे इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचा हा उपक्रम निश्चितच नाविन्यपूर्ण आणि कौतुकास्पद ठरला. या भेटीमुळे विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी प्राचार्य स्मिता लोंढे, शिल्पा गायधने, प्रशांत निकम यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


# जरांगेंच्या कुटुंबाचा सरकारला सवाल

## कुणबी आरक्षणावर संघर्षाची धार कायम

■ मुंबई (दै. संध्या)

मराठा-कुणबी आरक्षणाच्या मागणीवरून मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची धग कायम असतानाच त्यांच्या पत्नी आणि मुलीने सरकारच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "मराठा समाजाच्या मागणीचा निर्णय अजूनही का होत नाही?" असा सवाल करत त्यांनी सरकारने ठोस भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यामुळे आरक्षणाच्या प्रश्नावर सुरू असलेल्या आंदोलनाला आता कुटुंबीयांच्या भावनिक प्रतिक्रियेचीही किनार मिळाली आहे. मनोज जरांगे पाटील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ मिळावा, या मागणीवर ठाम आहेत. ऐतिहासिक कुणबी नोंदींच्या आधारे पात्र मराठ्यांना प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया वेगाने राबवावी, अशी त्यांची भूमिका आहे. यापूर्वी त्यांनी सरकारसमोर लाखो कुणबी नोंदींचा मुद्दा उपस्थित केला असून, नोंदी उपलब्ध असतील तर प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया प्रत्यक्षात वेगाने का होत नाही, असा सवाल केला आहे. दरम्यान, जरांगे यांनी मुंबईकडे आंदोलनासाठी कूच केले आहे. मुंबई पोलिसांकडून आंदोलनाला परवानगी नाकारण्यात आली असली तरी त्यांनी आंदोलनाचा निर्धार कायम ठेवला आहे. आझाद मैदानावर उपोषण करण्याच्या त्यांच्या भूमिकेमुळे प्रशासनासमोर कायदा-सुव्यवस्था, सार्वजनिक गैरसोय आणि आंदोलनाचा घटनात्मक अधिकार यांचा समतोल राखण्याचे आव्हान उभे राहिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जरांगे यांच्या १४ पैकी १२ मागण्या सरकारने मान्य केल्याचे सांगितले आहे. उर्वरित मागण्यांवर न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याने त्यावर तत्काळ निर्णय घेता येणार नाही, अशी सरकारची भूमिका आहे. त्याचबरोबर गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत आंदोलन न करण्याचे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे. मात्र, सरकारच्या या भूमिकेने जरांगे समर्थकांचे समाधान झालेले नाही.

# प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



■ बारामती (दै. संध्या)

प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे यांनी उपविभागीय कार्यालयात प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नायब तहसिलदार प्रतिभा शिंदे यांच्यासह उपविभागीय कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. तहसिलदार स्वप्नील रावडे यांनी केशव सीताराम ठाकरे ऊर्फ प्रबोधनकार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी तहसिल कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# सायबर फसवणुकीपासून सावध राहण्याचा संदेश

■ 'लोकसंवाद'मधून नागरिकांना मार्गदर्शन

■ मोबाईल हरवल्यास तातडीने तक्रार करा

■ शेअर बाजाराच्या नावाखालील बनावट 'फेसबुक', 'टेलिग्राम', 'व्हॉट्सॲप' ग्रुपपासून दूर राहण्याचे आवाहन

■ पुणे (दै. संध्या)




गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित महत्त्वाची माहिती थेट जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमांतर्गत तुळशीबाग गणेश मंडळासमोर नागरिकांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सायबर पोलीस उपनिरीक्षक योगिता कुदळे यांनी नागरिकांशी संवाद साधताना मोबाईल चोरी, ऑनलाइन फसवणूक तसेच शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन केले. मोबाईल हरवल्यास घाबरून न जाता तातडीने संबंधित यंत्रणेकडे ऑनलाइन तक्रार नोंदवावी तसेच आवश्यकतेनुसार सीआयआर नोंदविण्याची कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले. हरवलेल्या मोबाईलचा गैरवापर होऊ नये यासाठी नागरिकांनी विलंब न करता आवश्यक खबरदारी घेणे महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शेअर बाजारातील गुंतवणूक, प्रशिक्षण किंवा अधिक परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांना विविध 'फेसबुक', 'टेलिग्राम' आणि 'व्हॉट्सॲप' ग्रुपमध्ये सहभागी करून घेण्याचे प्रकार वाढत आहेत. अशा अनोळखी किंवा संशयास्पद ग्रुपमध्ये सहभागी होऊ नये. अल्पावधीत मोठा आर्थिक लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखविणारे संदेश, लिंक किंवा व्यक्तींच्या भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहनही उपनिरीक्षक कुदळे यांनी केले.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येत असल्याने 'लोकसंवाद-२०२६'च्या माध्यमातून शासकीय योजनांसोबतच नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित सुरक्षिततेच्या बाबींविषयीही जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांनी कोणतीही ऑनलाइन आर्थिक व्यवहाराची माहिती, गोपनीय संकेतांक किंवा इतर संवेदनशील माहिती अनोळखी व्यक्तीला देऊ नये, तसेच फसवणूक झाल्यास तातडीने संबंधित यंत्रणेशी संपर्क साधावा, असेही यावेळी सांगण्यात आले.

# निरपेक्ष कीर्तन सेवा संस्थेच्या जुन्नर तालुका अध्यक्षपदी डुकरे

■ नारायणगाव (दै. संध्या)




पारगाव तर्फे आळे येथील ह.भ.प. वर्षाताई भिवसेन डुकरे यांची निरपेक्ष कीर्तन सेवा संस्थेच्या जुन्नर तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांच्या या निवडीबद्दल गावातील ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

याच कार्यक्रमात पारगाव तर्फे आळे गावातील बाबाजी मारुती डुकरे यांची दुसऱ्यांदा गावातून बिनविरोध तंटामुक्ती अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भास्कर गाडगे, हभप. राजू महाराज पानसरे यांनी दोन्ही मान्यवरांना शुभेच्छा दिल्या. सत्कार समारंभास पारगावच्या सरपंच रेश्मा बोटकर, माजी सदस्या मनीषा जाधव ग्रामपंचायत सदस्या अर्चना डुकरे , पत्रकार सुनिल गहिने, भिवसेन डुकरे, रघुनाथ तट्टू, हभप. अशोक महाराज तट्टू, विलास शेळके, अतुल थोरात, दत्ता येवले, अक्षय सोनवणे, मारुती वाघू शिर्के यांच्यासह ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी शिवसेना शाखाप्रमुख संजय बाळासाहेब तट्टू व माजी उपसरपंच रामदास तट्टू यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले.

# चाकण येथे काँग्रेसची आढावा बैठक दिमाखात संपन्न

■ चाकण (दै. संध्या)



चाकण येथे काँग्रेसचे खेड तालुका अध्यक्ष चंद्रकांत गोरे यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसची आढावा बैठक मोठ्या दिमाखात संपन्न झाली. या बैठकीत काँग्रेसचे पुणे जिल्हा अध्यक्ष कमलाकर सातव यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना गाफील न राहता अलर्ट राहण्याचे आव्हान केले.

याप्रसंगी काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष शरद भसे, प्रवक्ते साहेबराव जाधव, एड. निलेश कड, समीर वर्तक, माणिकराव पाटोळे, आप्पासाहेब कड, काळूराम कड, वंदना सातपुते, सतीश राक्षे, संदीप नाईकरे, नंदकुमार वडगावकर, जमीर काझी, सुभाष होले, पंडित पवार, रज्जाक अन्सारी, मनोज शहा, गौतम वाव्हळ, महेश गोरे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कमलाकर सातव यावेळी म्हणाले," पूर्वीचे चाकण आणि आजचे चाकण यात मोठा बदल झाला आहे.

# ज्ञानवर्धिनीच्या विद्यार्थ्यांनी जाणून घेतला इतिहास

■ चाकण : (दै. संध्या)

हुतात्मा राजगुरू यांच्या जन्म स्थळाला भेट देत चाकण येथील ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी इतिहास जाणून घेतला. स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालयातील विद्यार्थ्यांची हुतात्मा शिवराम हरी राजगुरू जन्मस्थळ व सिद्धेश्वर मंदिर येथे स्थळ भेट अभ्यास सहल आयोजित करण्यात आली होती. या सहलीत तीनशे विद्यार्थी सहभागी झाले होते. संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापिका प्रमिला गोरे यांच्या नियोजनातून या अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्योजक गणेश गांधीले व राकेश पटेल यांनी राजगुरू जन्मस्थळास भेट देऊन विद्यार्थ्यांना चौफेर मार्गदर्शन केले. खेड तालुक्याचे सुपुत्र असलेले क्रांतिकारक हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेले कार्य विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरावे, त्यांना स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास समजावा तसेच आपल्या तालुक्यातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची माहिती व्हावी, या उद्देशाने या अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते, असे विकास गोरे यांनी सांगितले.

राजगुरूंच्या जन्मस्थळाची प्रत्यक्ष पाहणी करताना विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवन कार्याची व देशभक्तीची माहिती जाणून घेतली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल कुतूहल निर्माण होऊन देशप्रेमाची भावना अधिक दृढ होण्यास मदत झाली.

या सहलीसाठी शिक्षक सुनिल वडेकर, गणेश काळे, ज्योती लोंढे, सुनिल कोटलवार, नितिन शिंदे, छाया पठारे, ज्योती गाटचीरले, ऋतुजा क्षीरसागर, शुभांगी काळे, स्वाती तांबे, समीक्षा महाजन, अनिता देसाई व रोहिणी गायकवाड आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या प्रवासासाठी मंगेश गोरे, अरविंद देशमुख व काळुराम नाणेकर यांनी बसची सुविधा उपलब्ध करून दिली होती. प्रत्यक्ष ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन इतिहास जाणून घेण्याची संधी मिळाल्याने ही अभ्यास सहल विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली असल्याचे प्राचार्या प्रमिला गोरे यांनी सांगितले.



RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महतवाचे





### 'दगडूशेठ' गणपती उत्सवातील प्रेम मंदिराची १०० फूट उंच प्रतिकृती विश्वविक्रमात

**पुणे : दैनिक संध्या**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळाच्या १३४व्या गणेशोत्सवानिमित्त साकारण्यात आलेल्या वृंदावन येथील प्रसिद्ध शुभ्र संगमरवरी प्रेम मंदिराच्या १०० फूट उंच भव्य प्रतिकृतीची विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली आहे. गणेशोत्सवातील ही भव्य प्रतिकृती भाविक आणि पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. मूळ प्रेम मंदिराच्या सुंदर वास्तुरचनेची झलक या प्रतिकृतीत साकारण्यात आली आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या चेअरमन आणि मिस इंडिया डॉ. ईशा अगरवाल यांनी या विश्वविक्रमाची अधिकृत घोषणा केली. विश्वविक्रमाचे प्रमाणपत्र मंडळाचे ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी आणि सरचिटणीस व आमदार हेमंत रासने यांना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, डॉ. ईशा अगरवाल तसेच विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सचे संस्थापक-अध्यक्ष आणि प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यान प्रशिक्षक, १८४ विश्वविक्रम करणारे पहिले भारतीय ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.



### अखिल मंडई मंडळाकडून मंदिराची भव्य उभारणी

**पुणे : दैनिक संध्या**

भगवान विष्णू आणि भगवान शिव यांच्या एकात्म स्वरूपाचे प्रतीक असलेल्या हरिहर संकल्पनेवर आधारित भव्य मंदिराची उभारणी अखिल मंडई मंडळाकडून करण्यात आली आहे. शेषशायी विष्णूची मूर्ती, शिवपिंडी तसेच शिव-विष्णूच्या समन्वयाचे दर्शन मंदिरातून होत आहे. अखिल मंडई मंडळाच्या गणेशोत्सवाचे यंदा १३३ वे वर्ष आहे. तब्बल ९० बाय ६० फूट आकाराच्या मंडपात २५ फूट उंचीचे हे मंदिर साकारण्यात आले असून, देखाव्याची भव्यता भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. या मंदिरामध्ये हिंदू धर्मातील विविध पवित्र प्रतीकांचा समावेश करण्यात आला आहे. पारंपरिक मंदिराची रचना, धार्मिक प्रतीके आणि सजावटीच्या माध्यमातून शैव आणि वैष्णव परंपरांचा सुंदर समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

### श्री गणेश विसर्जनापूर्वी 'उत्तरपूजा' कशी करावी?

**पुणे : दैनिक संध्या**

गणेशोत्सवादरम्यान लाडक्या बाप्पाची मनोभावे सेवा व उपासना केल्यानंतर विसर्जनाच्या वेळी 'उत्तरपूजा' करणे अत्यंत महत्त्वाचे असते; मात्र ऐन विसर्जनाच्या वेळी अनेकदा गुरुजी (पुरोहित) उपलब्ध न होण्याची मोठी अडचण भेडसावते. अशा वेळी उत्तरपूजा कशी करावी, हा प्रश्न भाविकांना पडतो. भक्तांची हीच अडचण दूर करण्यासाठी 'सनातन संस्थे'ने एक अत्यंत उपयुक्त व्हिडिओ उपलब्ध करून दिला आहे. भाविकांनी केवळ हा व्हिडिओ लावून, त्यातील मंत्र आणि कृती ऐकत त्याप्रमाणे स्वत:ने पूजा केल्यास अत्यंत भावपूर्ण वातावरणात उत्तरपूजा संपन्न होऊ शकते. व्हिडिओ ऐकून आणि पाहून कुणालाही सहजपणे हा विधी करता येईल, अशा सोप्या पद्धतीने यात मार्गदर्शन केले आहे.



### नितीन नवीन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले 'दगडूशेठ' गणपतीचे दर्शन

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे : भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी गणरायाची आरती देखील केली. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे व स्थानिक नगरसेवक आदी उपस्थित होते. ट्रस्टचे सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी यांनी मान्यवरांचे स्वागत करीत यथोचित सन्मान केला. ट्रस्टचे सर्व विश्वस्त आणि सुवर्णयुग तरुण मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य सुजलाम सुफलाम व्हावे आणि पाण्याचे दुर्भिक्ष दूर व्हावे, असा संकल्प करीत गणरायाचरणी मान्यवरांनी प्रार्थना केली.

# गणेश मंडळांच्या माध्यमातून शासकीय योजनांची जनजागृती

**पुणे शहरात 'लोकसंवाद' उपक्रमाला प्रारंभ, माहिती व जनसंपर्क विभागाचा अभिनव उपक्रम; गुरुजी तालीम व तांबडी जोगेश्वरी गणेश मंडळात आयोजन**

■ पुणे (दै. संध्या)

गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती नागरिकांपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'लोकसंवाद-२०२६'या विशेष जनजागृती अभियानाला पुणे शहरात प्रारंभ झाला. जिल्हा माहिती कार्यालय, पुणे यांच्या वतीने आज गुरुजी तालीम गणेश मंडळ आणि तांबडी जोगेश्वरी गणेश मंडळ येथे 'लोकसंवाद' कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येत असल्याने या व्यासपीठाचा उपयोग शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती व्यापक स्वरूपात पोहोचविण्यासाठी करण्यात येत आहे. नागरिकांशी थेट संवाद साधणे, योजनांची माहिती देणे आणि पात्र लाभार्थ्यांना संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

**गुरुजी तालीम मंडळात कौशल्य विकास योजनांची माहिती**

गुरुजी तालीम गणेश मंडळ येथे आयोजित 'लोकसंवाद' कार्यक्रमात कौशल्य विकास व रोजगार अधिकारी दिग्विजय जमादार यांनी कौशल्य विकास विभागाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती दिली. युवकांसाठी उपलब्ध कौशल्य विकास प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी, स्वयंरोजगारासाठीच्या योजना तसेच कौशल्याधारित प्रशिक्षणातून रोजगारक्षमता वाढविण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

युवकांनी आपली आवड आणि शैक्षणिक पात्रता लक्षात घेऊन उपलब्ध कौशल्य प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, तसेच रोजगार व स्वयंरोजगारासाठीच्या शासकीय योजनांचा उपयोग करून घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.तांबडी जोगेश्वरी गणेश मंडळ येथे महिला व बालविकास विभागाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. महिला व बालविकास निरीक्षण गृहाचे अधीक्षक गजानन चाटे यांनी महिला व बालकांच्या आरोग्य, पोषण, शिक्षण, संरक्षण



आणि सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. महिलांसाठीच्या कल्याणकारी योजना, बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरणाच्या संधी तसेच बालकांच्या सर्वांगीण विकासासाठीच्या योजनांचा पात्र नागरिकांनी लाभ घ्यावा, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.'लोकसंवाद-२०२६' अंतर्गत गणेश मंडळांच्या ठिकाणी संबंधित विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी नागरिकांशी थेट संवाद साधत असून, योजनांची अधिकृत आणि सविस्तर माहिती देत आहेत. नागरिकांच्या प्रश्नांना संबंधित विभागाच्या प्रतिनिधींकडून थेट उत्तरे मिळत असल्याने योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शनही उपलब्ध होत आहे.पुणे शहरासह जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधील गणेश मंडळांमध्ये 'लोकसंवाद' कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. कृषी, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, आरोग्य, कौशल्य विकास, सहकार, सायबर सुरक्षा यासह विविध विभागांच्या योजना आणि उपक्रमांची माहिती या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. 'लोकसंवाद-२०२६' हा उपक्रम दि. २४ सप्टेंबरपर्यंत राबविण्यात येणार आहे. अधिकाधिक गणेश मंडळांनी या उपक्रमात सहभागी होऊन शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सहकार्य करावे.

## सकरा वर्ल्ड हॉस्पिटलचे सर्जन डॉ. बनर्जी बी.एच. यांना नवीन रोटेटर कफ रिपेअर उपकरणासाठी भारतीय पेटंट

■ पुणे (दै. संध्या)

एका आव्हानात्मक शस्त्रक्रियेतील अनुभवाचे स्वदेशी वैद्यकीय नवोपक्रमात रूपांतर करत, सकरा वर्ल्ड हॉस्पिटल, बेंगळुरू येथील एडिशनल डायरेक्टर – ऑर्थोपेडिक्स, डॉ. बनर्जी बी.एच. यांना त्यांच्या "Apparatus for Trans-Osseous Rotator Cuff Repair" या आविष्कारासाठी भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून भारतीय पेटंट प्रदान करण्यात आले आहे.

हे उपकरण पारंपरिक स्यूचर अँकरऐवजी हाडामध्ये तयार केलेल्या टनेल्सच्या माध्यमातून फाटलेला टेंडन पुन्हा जोडण्यास मदत करते. हाडांची गुणवत्ता कमी असलेल्या वृद्ध आणि ऑस्टिओपोरोसिसग्रस्त रुग्णांसाठी ही पद्धत विशेषतः उपयुक्त ठरू शकते.

या आविष्काराची कल्पना एका अशा रुग्णाच्या रोटेटर कफ रिपेअरदरम्यान सुचली,शस्त्रक्रियेदरम्यान डॉ. बनर्जी



यांच्या लक्षात आले की हाड पारंपरिक अँकरला पुरेशी पकड देत नव्हते.

रिपेअरच्या गुणवत्तेशी तडजोड करण्याऐवजी त्यांनी पर्यायी पद्धतीचा शोध घेण्यास सुरुवात केली, ज्यामध्ये टेंडनला थेट हाडामधून रिपेअर करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

हा अनुभव यशस्वी ठरला आणि त्यातून डॉ. बनर्जी यांना ट्रान्स-ओसियस रोटेटर कफ रिपेअर सुलभ करण्यासाठी विशेष उपकरण विकसित करण्याची प्रेरणा मिळाली. सुमारे तीन ते चार वर्षांच्या कालावधीत या नवोपक्रमाचा विकास आणि त्यामध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आल्या.

## जेसीबी इंडियाची बाऊमा कोनेक्सपो इंडिया २०२६ मध्ये १० नवीन मेड-इन-इंडिया उत्पादने सादर

■ पुणे (दै. संध्या)

जेसीबी इंडिया या अर्थमूव्हिंग आणि बांधकाम उपकरणांच्या आघाडीच्या उत्पादक कंपनीने बाऊमा कोनेक्सपो इंडिया २०२६ मध्ये १० नवीन उत्पादने सादर केली. ही नवीन श्रेणी भारतात डिझाइन, इंजिनिअर आणि उत्पादित केलेली असून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील ग्राहकांच्या बदलत्या गरजांची पूर्तता करते.





बाऊमा कोनेक्सपो इंडिया२०२६मध्ये जेसीबी इंडियाने आपल्या पोर्टफोलिओमधील २१ उत्पादने प्रदर्शित केली, ज्यामध्ये कंपनीच्या आयकॉनिक बॅकहो लोडर्सच्या नवीन श्रेणीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. उत्पादकता, इंधन कार्यक्षमता आणि ऑपरेटर अनुभवावर लक्ष केंद्रित करून प्रगत करण्यात आलेले नवीन ३डीएक्स, ३डीएक्स प्लस आणि ३डीएक्स सुपर लाँच करण्यात आले. या पोर्टफोलिओमध्ये भारतातील कामाच्या परिस्थितीच्या सखोल आकलनासह जागतिक अभियांत्रिकी आणि नाविन्यतेच्या मानकांची सांगड घालण्यात आली आहे. हे पाऊल आत्मनिर्भर भारतामध्ये योगदान देण्याच्या आणि भारताला जागतिक उत्पादन व निर्यात केंद्र म्हणून मजबूत करण्याच्या कंपनीच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. जेसीबी इंडियाचे सीईओ आणि मॅनेजिंग डायरेक्टर श्री. दीपक शेट्टी म्हणाले, "भारत अभूतपूर्व वेगाने आणि मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांची निर्मिती करत आहे.

## ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्ट संस्थेच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यालयाचे उद्‌घाटन

■ पुणे (दै. संध्या)

ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्ट या संस्थेच्या अधिकृत कार्यालयाचे आज उद्‌घाटन करण्यात आले. महाराष्ट्रातील लावणी, लोकधारा, ऑर्केस्ट्रा, बॅकस्टेज कलाकार, नाटक, एकपात्री प्रयोग आणि चित्रपट क्षेत्रातील कलाकारांच्या पाठीशी उभी राहणारी एक महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. सहा वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या या संस्थेचे कार्यालय झाल्याने कलाकारांना हक्काची जागा मिळाली आहे. येत्या काळात ही संस्था पुण्याच्या संस्कृतीचा केंद्रबिंदू बनेल, असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.

सिंहगड रोडवरील पानमळा येथील मैथिली सभागृहाच्या आवारात ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्टच्या कार्यालयाचे उद्‌घाटन करण्यात आले. चंद्रकांत दादा पाटील यांनी आभासी माध्यमाद्वारे यावेळी उपस्थितांशी संवाद साधला. याप्रसंगी



नगरसेविका रुपाली धावडे, नगरसेविका मंजूश्री खर्डेकर, भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते संदिप खर्डेकर, नगरसेविका वृषाली रिठे, पिंपरी-चिंचवड कलाकार महासंघाचे अध्यक्ष विजयकुमार उलपे, लावणीसम्राज्ञी सुरेखा पुणेकर, मैथिली स्टुडिओचे मिलिंद माळी, समुत्कर्षच्या मधुरा वैशंपायन व 'ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्ट'चे अध्यक्ष योगेश सुपेकर उपस्थित होते. चंद्रकांत पाटील म्हणाले, "आज व्यस्त दिनक्रमामुळे उपस्थित राहू शकलो नाही. मात्र येत्या काही दिवसांत कार्यालयाला निश्चितच भेट देणार आहे.

## आवाज डोरेमॉनचा... ओळख श्रीसाईची!

■ पुणे (दै. संध्या)

कधी एखाद्या व्यक्तीला जगासमोर येण्यासाठी मोठे व्यासपीठ लागत नाही... लागतो तो फक्त एक आवाज, एक संधी आणि आपल्याला ऐकून घेणारी काही माणसं! आंध्र प्रदेशातील बापटला येथील २२ वर्षीय श्रीसाईच्या आयुष्याची कहाणी याच भावनेला अधोरेखित करणारी आहे. बालपणी आईला गमावल्याने आणि आजी-आजोबांच्या सहवासात वाढलेल्या श्रीसाईने एकेकाळी अनुभवलेले एकटेपण आज हजारो लोकांशी जोडण्याचे माध्यम बनवले आहे. लोकप्रिय कार्टून पात्र 'डोरेमॉन'च्या हुबेहुब आवाजाची नक्कल करण्याच्या कलेने त्याला वेगळी ओळख मिळवून दिली आणि त्याच आवाजाच्या माध्यमातून इतरांनाही व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ मिळाले.

या कठीण काळातही त्याच्या मनातील स्वप्ने कमी झाली नाहीत. गीतलेखन, संकलन, आशय निर्मिती आणि कथाकथन यासारख्या सर्जनशील क्षेत्रांमध्ये त्याला विशेष रस होता. भविष्यात तेलुगू चित्रपटसृष्टीत स्वतःची ओळख निर्माण करण्याचे त्याचे स्वप्न आहे.

सुरुवातीला केवळ कोणीतरी सोबत असावे, संवाद साधता यावा आणि मनातील गोष्टी व्यक्त करता याव्यात, या भावनेतून तो फ्रेंड ऐप शी जोडला गेला. मात्र, या व्यासपीठाने त्याला केवळ काही क्षणांची साथ दिली नाही; तर ऐकणारा, बोलणारा आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारा एक मोठा समुदाय मिळवून दिला.

याच समुदायात त्याला काही जवळचे मित्र मिळाले. मैत्रीपासून सुरू झालेला हा प्रवास पुढे त्याच्या सर्जनशील कलेला नवी दिशा देणारा ठरला. श्रीसाईकडे असलेली मिमिक्रीची कला या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरली. लोकप्रिय कार्टून पात्र डोरेमॉनच्या आवाजाची हुबेहुब नक्कल करण्याची त्याची कला फ्रेंड ऐप वर त्याची वेगळी ओळख बनली. त्यानंतर त्याने फ्रेंड आरजे म्हणून ग्रुप ऑडिओ रूम्स होस्ट करण्यास सुरुवात केली.

'टॉक विथ डोरेमॉन' आणि 'डान्स विथ डोरेमॉन' या कार्यक्रमांमधून त्याने बालपणापासून परिचित असलेल्या डोरेमॉनच्या आवाजाला मनोरंजन, संवाद आणि मैत्रीचे माध्यम बनवले. श्रीसाईची भूमिका केवळ आवाजाची नक्कल करण्यापुरती मर्यादित राहिली नाही. लाईव्ह ऑडिओ रूममध्ये नव्या व्यक्तीचे स्वागत करणे, संभाषणाला दिशा देणे, प्रश्न विचारणे, वातावरण हलकेफुलके ठेवणे आणि प्रत्येकाला व्यक्त होण्यासाठी संधी देणे, अशी त्याची भूमिका बनली.

# जीवन विमा: सुरक्षा कवचाच्या पलीकडे, स्वप्नांना साकार करण्याचा आधार


■ पुणे (दै. संध्या)

एका आव्हानात्मक शस्त्रक्रियेतील अनुभवाचे स्वदेशी वैद्यकीय नवोपक्रमात रूपांतर करत, सकरा वर्ल्ड हॉस्पिटल, बेंगळुरू येथील एडिशनल डायरेक्टर – ऑर्थोपेडिक्स, डॉ. बनर्जी बी.एच. यांना त्यांच्या "Apparatus for Trans-Osseous Rotator Cuff Repair" या आविष्कारासाठी भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून भारतीय पेटंट प्रदान करण्यात आले आहे.

हे उपकरण पारंपरिक स्यूचर अँकरऐवजी हाडामध्ये तयार केलेल्या टनेल्सच्या माध्यमातून फाटलेला टेंडन पुन्हा जोडण्यास मदत करते. हाडांची गुणवत्ता कमी असलेल्या वृद्ध आणि ऑस्टिओपोरोसिसग्रस्त रुग्णांसाठी ही पद्धत विशेषतः उपयुक्त ठरू शकते.

या आविष्काराची कल्पना एका अशा रुग्णाच्या रोटेटर कफ रिपेअरदरम्यान सुचली,शस्त्रक्रियेदरम्यान डॉ. बनर्जी यांच्या लक्षात आले की हाड पारंपरिक अँकरला पुरेशी पकड देत नव्हते. रिपेअरच्या गुणवत्तेशी तडजोड करण्याऐवजी त्यांनी पर्यायी पद्धतीचा शोध घेण्यास सुरुवात केली, ज्यामध्ये टेंडनला थेट हाडामधून रिपेअर करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

हा अनुभव यशस्वी ठरला आणि त्यातून डॉ. बनर्जी यांना ट्रान्स-ओसियस रोटेटर कफ रिपेअर सुलभ करण्यासाठी विशेष उपकरण



विकसित करण्याची प्रेरणा मिळाली. सुमारे तीन ते चार वर्षांच्या कालावधीत या नवोपक्रमाचा विकास आणि त्यामध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आल्या.

आर्थ्रोस्कोपिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या या तंत्रात हाडामध्ये टनेल तयार करून त्यामधून स्यूचर पास केला जातो आणि फाटलेल्या टेंडनला पुन्हा हाडाशी जोडले जाते. पारंपरिक अँकरची गरज कमी करण्याबरोबरच काही रुग्णांमध्ये उपचाराचा खर्च आणि इम्प्लांटशी संबंधित संभाव्य गुंतागुंत कमी होण्याची शक्यता आहे. सकरा वर्ल्ड हॉस्पिटल, बेंगळुरूचे ॲडिशनल डायरेक्टर – ऑर्थोपेडिक्स आणि या उपकरणाचे आविष्कारक, डॉ. बनर्जी बी.एच.म्हणाले, "या नवोपक्रमाची कल्पना एका आव्हानात्मक रोटेटर कफ रिपेअरदरम्यान सुचली. या रुग्णाच्या हाडांची गुणवत्ता कमकुवत होती आणि पारंपरिक अँकर फिक्सेशन करणे आव्हानात्मक ठरत होते. रिपेअरच्या गुणवत्तेशी तडजोड करण्याऐवजी, टेंडनला हाडामधून सुरक्षितपणे जोडण्याची शक्यता तपासण्याचा मी निर्णय घेतला. या अनुभवातून मला ही पद्धत सुलभ करणारे उपकरण विकसित आणि अधिक परिष्कृत करण्याची प्रेरणा मिळाली. पेटंट मिळणे हा माझ्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे, कारण ऑपरेशन थिएटरमध्ये आलेल्या एका आव्हानापासून संभाव्य उपायापर्यंतचा हा प्रवास दर्शवतो. विशेषतः हाडांची गुणवत्ता कमकुवत असल्यामुळे पारंपरिक अँकर-आधारित रिपेअर करणे कठीण ठरणाऱ्या प्रकरणांमध्ये सर्जनना आणखी एक पर्याय उपलब्ध करून देणे, हा माझा उद्देश आहे. तसेच ऑर्थोपेडिक सर्जरीच्या क्षेत्रातील स्वदेशी नवोपक्रमाला प्रोत्साहन देण्यात योगदान देण्याची माझी इच्छा आहे."

## थोडक्यात पण महत्वाचे

IDFC FIRST Bank

### आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या सर्व क्रेडिट कार्डवर ‘झिरो फॉरेक्स मार्कअप’

**मुंबई : दैनिक संध्या**

ग्राहकांना प्राधान्य देण्याच्या धोरणांतर्गत आयडीएफसी फर्स्ट बँकेने आपल्या सर्व विद्यमान तसेच नवीन क्रेडिट कार्डधारकांसाठी विनाअट ‘झिरो फॉरेक्स मार्कअप’ सुविधा जाहीर केली आहे. अशा प्रकारची सुविधा सर्व क्रेडिट कार्डांवर देणारी भारतातील पहिली बँक असल्याचा दावा बँकेने केला आहे. या सुविधेसाठी ग्राहकांना नवीन क्रेडिट कार्ड घेण्याची, विद्यमान कार्ड अद्ययावत करण्याची किंवा ठराविक रकमेची आंतरराष्ट्रीय खरेदी करण्याची आवश्यकता नाही. बँकेच्या विद्यमान क्रेडिट कार्डांवर ही सुविधा आपोआप लागू होणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारांवर सामान्यतः ३.५ टक्क्यांपर्यंत फॉरेक्स मार्कअप शुल्क आणि त्यावर वस्तू व सेवा कर आकारला जातो. उदाहरणार्थ, एक लाख रुपयांच्या व्यवहारावर या शुल्कामुळे सुमारे ४,१३० रुपयांची अतिरिक्त रक्कम भरावी लागू शकते. ‘झिरो फॉरेक्स मार्कअप’ सुविधेमुळे आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या ग्राहकांना ही अतिरिक्त रक्कम वाचवता येणार आहे.

### सौरभ मुंढड़ा यांची सह-संस्थापक आणि पश्चिम विभागप्रमुख म्हणून नियुक्ती



**पुणे : दैनिक संध्या**

व्यवसाय आणि उद्योजकांना त्यांच्या गरजेनुसार गुंतवणूक व भांडवली उपाययोजना उपलब्ध करून देणाऱ्या दक्षम कॅपिटलने सौरभ मुंढड़ा यांची १ ऑगस्ट २०२६ पासून सह-संस्थापक आणि पश्चिम विभागाचे प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. कॉर्पोरेट बँकिंग, भांडवली बाजार, धोरणात्मक वित्त आणि सल्लागार क्षेत्रात दोन दशकांहून अधिक अनुभव असलेले मुंढड़ा पश्चिम विभागातील दक्षम कॅपिटलचा सल्लागार व्यवसाय उभारणी व विस्ताराचे नेतृत्व करणार आहेत. दक्षम कॅपिटल सध्या संपत्ती सल्ला, खासगी भांडवल आणि धोरणात्मक सल्ला या क्षेत्रांमध्ये संशोधनाधारित व्यासपीठ विकसित करत आहे. कुटुंबीय कार्यालय सल्ला, खासगी बँकिंग, गुंतवणूक बँकिंग, मालमत्ता व्यवस्थापन आणि संरचित आर्थिक उपाययोजना अशा विविध सेवांच्या माध्यमातून उद्योजक, प्रवर्तक, कुटुंबे आणि व्यवसायांशी संबंध अधिक दृढ करण्यावर कंपनीचा भर आहे. सौरभ मुंढड़ा यांचा कॉर्पोरेट वित्त आणि भांडवली बाजारातील अनुभव दक्षमच्या विस्ताराला बळ देणार आहे. पश्चिम विभागात सल्लागार व्यवसाय वाढविण्यासोबतच विकास, भांडवलाचे वाटप आणि धोरणात्मक आर्थिक निर्णयांबाबत प्रवर्तक व उद्योजकांशी दीर्घकालीन संबंध निर्माण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल.

### साध्या पोटाच्या त्रासाच्या तपासणीत किडनीचा कर्करोग; शस्त्रक्रिया यशस्वी

**पुणे : दैनिक संध्या**

जुलाबाच्या त्रासासाठी करण्यात आलेल्या प्राथमिक तपासणीत किडनीमध्ये कर्करोगाची गाठ आढळलेल्या ४४ वर्षीय महिलेवर भोसरी येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये किडनी वाचविणारी गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आली. कर्करोगाची गाठ पूर्णपणे काढण्यात आली असून संपूर्ण किडनी काढण्याची गरज भासली नाही. रुग्णाची प्राथमिक तपासणी मेडिकव्हर हॉस्पिटलचे वरिष्ठ फिजिशियन डॉ. रिझवान मलिक यांनी केली. सोनोग्राफीदरम्यान किडनीमध्ये गाठ आढळल्यानंतर कॉन्ट्रास्ट सीटी स्कॅन करण्यात आला. त्यामध्ये उजव्या किडनीमध्ये रेनल सेल कार्सिनोमाचा संशय असलेली गाठ आढळून आली. त्यानंतर रुग्णाला मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. निखिल थर्स्टिंग आणि सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. आशिष बांगर यांच्याकडे पुढील उपचारांसाठी संदर्भित करण्यात आले. मेडिकव्हर हॉस्पिटलच्या बहुविशेषज्ञ ट्यूमर मंडळाने या प्रकरणाचा सखोल अभ्यास केला. या मंडळात डॉ. आशिष बांगर, डॉ. निखिल थर्स्टिंग, युरोलॉजिस्ट डॉ. सुमित चौधरी, तसेच रेडिओलॉजिस्ट डॉ. अक्षय चिकर आणि डॉ. अमेय महाजन यांचा समावेश होता. गाठीचा रेनल नेफ्रोमेट्री गुणांक १० असल्याने ती अत्यंत गुंतागुंतीची असल्याचे निदर्शनास आले. संपूर्ण किडनी काढण्याऐवजी किडनीचे कार्य शक्य तितके जपण्याच्या उद्देशाने अंशतः नेफ्रेक्टॉमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. डॉ. आशिष बांगर यांच्या नेतृत्वाखाली लॅप्रोस्कोपिक पद्धतीने अंशतः नेफ्रेक्टॉमी करण्यात आली. या शस्त्रक्रियेद्वारे कर्करोगाची गाठ काढून किडनीचा उर्वरित निरोगी भाग जतन करण्यात आला. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची किडनीची कार्यक्षमता स्थिर राहिली. तसेच रक्तस्राव, लघवीची गळती किंवा संसर्ग यांसारखी कोणतीही गुंतागुंत झाली नसल्याचे रुग्णालयाने सांगितले. हिस्टोपॅथॉलॉजी तपासणीच्या अहवालात क्लिअर सेल रेनल सेल कार्सिनोमा, डब्ल्यूएचओ/आयएसयूपी ग्रेड २ आणि पीटी१ए अवस्था असल्याचे स्पष्ट झाले. गाठ पूर्णपणे काढण्यात आली असून शस्त्रक्रियेचे मार्जिन कर्करोगमुक्त असल्याचे अहवालातून स्पष्ट झाले. बहुविशेषज्ञांच्या समन्वयातून करण्यात आलेल्या या उपचारामुळे कर्करोगाची गाठ पूर्णपणे काढण्यासोबतच रुग्णाची किडनीही जतन करण्यात आली.

# बजाज इलेक्ट्रिकल्स ‘बिग बॉस हिंदी सीझन २०’चे सह-प्रायोजक

■ पुणे (दै. संध्या)

बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने भारतातील सर्वात लोकप्रिय शोपैकी एक असलेल्या 'बिग बॉस हिंदी सीझन २०' चे सह-प्रायोजकत्व स्वीकारले आहे. या ब्रँडची तीन अत्यावश्यक घरगुती उत्पादने—गीझर, मिक्सर ग्राइंडर आणि वायर्स—बिग बॉसच्या घरात आणली जातील.

गेल्या आठ दशकांपासून भारतीय घरांचा एक भाग असलेल्या या ब्रँडसाठी ही भागीदारी अगदी स्वाभाविक आहे. बिग बॉसच्या घरातील स्वयंपाकघर आणि स्नानगृह—जिथे दररोज मिक्सर आणि गीझर वापरले जातात—आता बजाज इलेक्ट्रिकल्सचा प्लॅटफॉर्म बनतील. संपूर्ण सीझनभर या जागांवर ब्रँडची उपस्थिती दिसून येईल आणि टीव्ही स्क्रीनवरील महत्त्वाच्या प्रसंगी ब्रँडचा लोगो दाखवला जाईल. शोमध्ये दाखवण्यात येणारी तीन उत्पादने त्यांची खास वैशिष्ट्ये प्रदर्शित करतील या उत्पादनांना ठळकपणे दाखवण्यासाठी घरात विशेष टास्क




असणार आहेत. शोचे होस्ट सलमान खान त्यांचा उल्लेख करतील, बजाजची प्रसिद्ध ट्यून वाजवली जाईल, दर्शकांसाठी स्पर्धा आयोजित केल्या जातील आणि टीव्ही व डिजिटल प्लॅटफॉर्मवर जाहिराती दाखवल्या जातील. बजाज इलेक्ट्रिकल्स सध्या आपला ग्राहक व्यवसाय मजबूत करण्यावर आणि नवीन उत्पादने बाजारात आणण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. बिग बॉससारख्या देशव्यापी पोहोच असलेल्या व्यासपीठाचा वापर करून, हा ब्रँड आपली नाविन्यपूर्ण उत्पादने ग्राहकांसमोर आणत आहे, जेणेकरून अनेक वर्षांपासून या ब्रँडचे ग्राहक असलेल्यांना, तसेच नवीन ग्राहकांना अत्याधुनिक उत्पादनांची माहिती मिळेल.

जिओस्टारच्या प्रवक्त्याने सांगितले, "बिग बॉस हा भारतातील सर्वात मोठ्या आणि प्रतिष्ठित मनोरंजन कार्यक्रमांपैकी एक आहे, ज्याची पोहोच आणि प्रेक्षकांचा सहभाग अतुलनीय आहे. बिग बॉस हिंदीच्या २० व्या पर्वात बजाज इलेक्ट्रिकल्सचे स्वागत करताना आम्हाला आनंद होत आहे. ही भागीदारी ब्रँडला कार्यक्रमाच्या अगदी केंद्रस्थानी आणेल, जिथे तो योग्य आणि समर्पक मार्गांनी कार्यक्रमाचा एक भाग बनेल, ज्यामुळे देशभरातील प्रेक्षकांशी अधिक घनिष्ठ नाते निर्माण होईल."

बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेडचे अध्यक्ष, शेखर बजाज म्हणाले, "बजाज इलेक्ट्रिकल्स गेल्या आठ दशकांपासून भारतीय घरांचा एक भाग आहे आणि पिढ्यानपिढ्यांनी त्यावर विश्वास ठेवला आहे. एक भारतीय ब्रँड म्हणून, देशातील सर्वात लोकप्रिय शो 'बिग बॉस' सोबत जोडले जाणे ही आमच्यासाठी एक मोठी संधी आहे. याच्या माध्यमातून, आम्ही आमची नाविन्यपूर्ण उत्पादने आजच्या प्रेक्षकांसमोर सादर करू आणि त्यांच्यासोबत एक नवीन नाते निर्माण करू." बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, संजय सचदेवा म्हणाले, "ही भागीदारी आमच्या प्रवासातील एका अत्यंत रोमांचक टप्प्यावर आली आहे, जिथे आम्ही आजच्या ग्राहकांच्या पसंतीनुसार आमचा ब्रँड आणि संस्थेमध्ये बदल घडवत आहोत. आम्ही आमचा ग्राहक व्यवसाय अधिक मजबूत करत असताना, बिग बॉस हा शो आमच्या गीझर, मिक्सर आणि वायर्ससारख्या सतत सुधारणाऱ्या उत्पादनांना संपूर्ण देशाशी जोडण्यासाठी एक उत्तम मंच प्रदान ठरेल. यामुळे आम्हाला आजच्या आणि उद्याच्या भारतीयांसाठी अधिक उपयुक्त बनण्यास मदत होईल."

बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेडच्या मुख्य विपणन अधिकारी, टायनी सेनगुप्ता म्हणाल्या, "बजाजची उत्पादने नेहमीच बहुतांश भारतीय घरांसाठी एक विश्वासू सोबती राहिली आहेत. ग्राहक 'भारता'चे आहेत की 'इंडिया'चे, आमच्याकडे बजेटपासून ते प्रीमियम श्रेणीपर्यंत, प्रत्येक घरगुती गरजेसाठी उत्पादने आहेत. बिग बॉसचे घर हे मूलतः याच ग्राहकांचे आणि भारतीय कुटुंबांचे एक छोटेसे रूप आहे, जिथे आमची उत्पादने प्रदर्शित केली जातील. आमची उत्पादने दैनंदिन जीवनात किती सहजपणे सामावतात आणि ती प्रेक्षकांना आपलीशी वाटतील व त्यांना आवडतील अशा पद्धतीने सादर केली जातात, हे दाखवण्यासाठी यापेक्षा चांगली जागा नाही."

## भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकाचे प्रत्यक्ष काम तातडीने सुरू करा

■ पुणे/मुंबई (दै. संध्या)

भीमा कोरेगाव येथील ऐतिहासिक विजयस्तंभ स्मारकाच्या मंजूर १०० कोटी रुपयांच्या बृहत् विकास आराखड्यांतर्गत प्रत्यक्ष कामाला तातडीने सुरुवात करावी, अशी मागणी भीमा कोरेगाव विजयस्तंभ राष्ट्रीय स्मारक समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे आणि पुण्याचे माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. स्मारकाच्या भूसंपादन प्रक्रियेसाठी ३० कोटी रुपयांचा निधी तातडीने वर्ग करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. पुणे दिवाणी न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निकालात विजयस्तंभ स्मारकासाठी जागा संपादित करताना कायदेशीर प्रक्रिया राबविणे आवश्यक असल्याचे नमूद केले



आहे. या पार्श्वभूमीवर डंबाळे आणि डॉ. धेंडे यांनी सामाजिक न्याय मंत्र्यांसह पुणे जिल्हाधिकाऱ्यांनाही स्वतंत्र निवेदन दिले आहे. संयुक्त निवेदनात राहुल डंबाळे आणि डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी म्हटले आहे की, राज्य सरकारने २०२७ पर्यंत विजयस्तंभ परिसराचा विकास करण्यासाठी १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून सुशोभीकरणासह आवश्यक पायाभूत सुविधांची कामे तातडीने सुरू होणे गरजेचे आहे.

## ‘राइज अँड फॉल सीझन २’चे मोफत प्रक्षेपण

■ मुंबई (दै. संध्या)

सत्ता, रणनीती, बदलती समीकरणे आणि अनपेक्षित वळणांनी भरलेल्या ‘राइज अँड फॉल’ या रिॲलिटी शोच्या दुसऱ्या पर्वाची उत्सुकता आता वाढली आहे. प्राइम व्हिडिओने ‘राइज अँड फॉल सीझन २’चा नवा प्रोमो प्रदर्शित केला असून, त्यातून १५ स्पर्धकांपैकी पहिल्या चार स्पर्धकांची ओळख करून देण्यात आली आहे. यामध्ये स्वरा भास्कर, शहजाद पूनावाला, प्रियांका चाहर चौधरी आणि करण पटेल यांचा समावेश आहे. बनिजय एशियाची निर्मिती असलेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवाग करणार आहे. या खेळात सत्तेची समीकरणे क्षणाक्षणाला बदलणार असून, आजचा सत्ताधारी उद्या सामान्य स्पर्धकाच्या भूमिकेत येऊ शकतो. २६ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या या पर्वात सलग ४२ दिवस रणनीती, संघर्ष, नाट्य




आणि मनोरंजनाचा अनुभव प्रेक्षकांना घेता येणार आहे. प्रोमोमध्ये स्पष्टवक्तेपणासाठी ओळखली जाणारी स्वरा भास्कर, दूरचित्रवाणीवरील चर्चांमधून आता रिॲलिटी शोच्या मैदानात उतरणारे शहजाद पूनावाला, रिॲलिटी कार्यक्रमांचा अनुभव असलेली प्रियांका चाहर चौधरी आणि दूरचित्रवाणीवरील परिचित चेहरा करण पटेल यांची झलक पाहायला मिळते. प्रोमोमध्ये चारही स्पर्धक आपापल्या शैलीत एकमेकांवर टिप्पणी करताना दिसतात. त्यामुळे आगामी भागांमध्ये त्यांच्यातील रणनीती, मतभेद आणि बदलती आघाडी यामुळे मनोरंजनाला चांगलीच रंगत येण्याची शक्यता आहे. प्रियांका चाहर चौधरी म्हणाली, “मी वेगवेगळ्या प्रकारचे रिॲलिटी शो अनुभवले आहेत; मात्र ‘राइज अँड फॉल सीझन २’मध्ये या खेळाला पूर्णपणे वेगळे स्वरूप आहे. सत्ताधारी व्यक्ती सामान्य स्पर्धक बनू शकते आणि आपल्या निर्णयांनुसार आपले स्थान बदलू शकते, ही बाब माझ्यासाठी अधिक रोमांचक आहे. या खेळात अंतःप्रेरणेवर विश्वास ठेवून प्रत्येक परिस्थितीला सामोरे जाण्याची तयारी आहे. कोणतीही भूमिका मिळाली तरी ती स्वीकारून मी किती पुढे जाऊ शकते, हे मला पाहायचे आहे.” स्वरा भास्कर म्हणाली, “मी नेहमीच माझी मते स्पष्टपणे मांडत आले आहे. त्यामुळे ‘राइज अँड फॉल सीझन २’मध्ये सहभागी होणे हा माझ्यासाठी वेगळा अनुभव असेल. विविध दृष्टिकोन असलेली व्यक्तिमत्त्वे एका ठिकाणी येणार आहेत.

## इफ्कोचे अध्यक्ष दिलीप सांघाणी यांची ICAच्या ग्लोबल बोर्डावर निवड

‘ॲट-लार्ज डायरेक्टर’ म्हणून निवड; जागतिक सहकार क्षेत्रात भारताचा आवाज होणार अधिक बुलंद

■ पुणे (दै. संध्या)

भारतीय सहकार क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या घडामोडीत इफ्कोचे अध्यक्ष दिलीप सांघाणी यांची आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीच्या (ICA) ग्लोबल बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर ‘ॲट-लार्ज डायरेक्टर’ म्हणून निवड झाली आहे. पनामा येथे झालेल्या ICAच्या महासभेदरम्यान झालेल्या निवडणुकीत सांघाणी यांना ही जबाबदारी मिळाली.

सांघाणी यांच्या विजयाची घोषणा होताच पनामा येथे उपस्थित भारतीय सहकारी प्रतिनिधी मंडळात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. प्रतिनिधींनी ‘भारत माता की जय’ आणि ‘वंदे मातरम्’च्या घोषणा देत आनंद व्यक्त केला. जागतिक सहकार क्षेत्राच्या व्यासपीठावर भारतीय प्रतिनिधीची झालेली निवड ही देशाच्या सहकार चळवळीच्या वाढत्या प्रभावाचे द्योतक मानली जात आहे. दिलीप सांघाणी गेल्या अनेक दशकांपासून सहकार क्षेत्राशी संबंधित असून, शेतकऱ्यांचे सक्षमीकरण, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना आणि



सहकारी संस्थांचे बळकटीकरण यासाठी त्यांनी काम केले आहे. ते सध्या इफ्को तसेच गुजरात को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन (गुजकोमासोल)चे अध्यक्ष आहेत. याशिवाय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध सहकारी संस्थांमध्ये त्यांनी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडी (ICA) ही जगातील प्रमुख सहकारी संस्थांची जागतिक संघटना असून, विविध देश आणि प्रदेशांमधील सहकारी संस्थांचे प्रतिनिधित्व करते. ICAच्या ग्लोबल बोर्डावर भारताचे प्रतिनिधित्व झाल्यामुळे जागतिक सहकार क्षेत्रातील भारतीय दृष्टिकोन आणि अनुभव मांडण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. सांघाणी यांच्या निवडीमुळे भारतीय सहकार चळवळीला मिळालेली जागतिक मान्यता अधोरेखित झाली आहे. ‘सहकारातून समृद्धी’ या संकल्पनेला जागतिक पातळीवर पुढे नेण्यासाठीही या निवडीला महत्त्व प्राप्त झाले आहे. सहकाराच्या माध्यमातून शेतकरी, ग्रामीण समुदाय आणि सामान्य नागरिकांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण करण्याच्या भारतीय अनुभवाची जागतिक पातळीवर मांडणी करण्याची संधी यामुळे मिळणार आहे. विजयानंतर आभार व्यक्त करताना दिलीप सांघाणी यांनी ICAचे सदस्य देश, प्रतिनिधी आणि जागतिक सहकार क्षेत्रातील सर्व घटकांचे आभार मानले. भारतीय सहकार चळवळीची भावना, अनुभव आणि दृष्टिकोन जागतिक व्यासपीठावर प्रभावीपणे मांडण्यासोबतच जगभरातील सहकारी संस्थांमधील सहकार्य अधिक बळकट करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

## ॲमेझॉन कडून भारतात ऑल-न्यू अलेक्सा+ लाँच

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

ॲमेझॉन ने आज भारतात ऑल-न्यू अलेक्सा+ च्या लाँचची घोषणा केली. अलेक्सा+ हा ॲमेझॉन चा जनरेटिव्ह एआय-सक्षम पर्सनल असिस्टंट आहे, जो संवाद साधणारा, अधिक स्मार्ट, वैयक्तिकृत, अस्सल भारतीय आणि प्रत्यक्ष जगातील कामे पूर्ण करणारा आहे. भारतात, अलेक्सा+ ग्राहकांच्या दैनंदिन जीवनातील अनेक सेवा आणि डिवाईसेससोबत काम करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे, ज्यात स्मार्ट होम नियंत्रण, खरेदी, जेवणाचे नियोजन, रेस्टॉरंटचे आरक्षण आणि प्रवासाचे नियोजन यांपासून संगीत शोधणे आणि मनोरंजनापर्यंत सर्व गोष्टींचा समावेश आहे. हे सर्व इंग्रजी, हिंदी आणि हिंग्लिशमधील आपसूक संभाषणाद्वारे शक्य होते. आजपासून, भारतातील ग्राहक पात्र इको स्मार्ट स्पीकर्स आणि स्मार्ट डिस्प्ले, फायर टीव्ही स्ट्रीमिंग डिवाईसेस आणि अलेक्सा+ मोबाइल ॲपवर प्रारंभिक प्रवेश अंतर्गत मोफत अलेक्सा+ चा अनुभव घेऊ शकतात. ॲमेझॉन इंडिया च्या अलेक्सा+



साठी कंट्री मॅनेजर टीना सिदाना म्हणाल्या: "भारतातील कुटुंबे बहु-पिढ्यांची, बहुभाषिक आणि बहुवैचारिक आहेत. अलेक्सा+ याच गुंतागुंतीचा विचार करून डिझाइन करण्यात आली आहे. ती हेतू समजून घेते, तुमच्या कुटुंबाच्या आवडीनिवडींशी जुळवून घेते आणि घरातील प्रत्येक सदस्याला जो मार्ग सर्वात नैसर्गिक वाटतो त्यानुसार संवाद साधण्याची सुविधा देते. भारत हा जगातील सर्वात वैविध्यपूर्ण ग्राहकांचे माहेरघर आहे, आणि अलेक्सा+ आता किती अधिक स्मार्ट, व्यक्तीनुरूप आणि अधिक सहज-सुलभ झाली आहे, याचा अनुभव घेण्यासाठी ते उत्सुक आहेत याचा आम्हाला आनंद आहे. ती खऱ्या अर्थाने त्यांच्या जीवनशैलीनुसार विकसित केली गेली आहे.

# रॅकॉल्ड कडून प्रोन्टो डार्क ५ लि लाँच

■ पुणे (दै. संध्या)

भारतातील आघाडीच्या प्रीमियम वॉटर हीटिंग ब्रँडपैकी एक असलेल्या रॅकॉल्ड ने आपल्या इन्स्टंट वॉटर हीटर पोर्टफोलिओमध्ये प्रोन्टो डार्क ५ लि या नव्या उत्पादनाची भर घातली आहे. आधुनिक आणि डिझाइनबाबत जागरूक ग्राहकांना लक्षात घेऊन तयार करण्यात आलेला प्रोन्टो डार्क , इटालियन डिझाइन, आकर्षक ग्लॉसी डार्क फिनिश, जागा वाचवणारे स्लीक डिझाइन आणि जलद हीटिंग परफॉर्मन्स यांचा मेळ घालतो. त्यामुळे स्टाइल आणि दैनंदिन वापरातील कार्यक्षमता यांचा सुंदर संगम साधणारे हे प्रीमियम उपकरण ठरते.

कॉम्पॅक्ट डिझाइन आणि आकर्षक डार्क फिनिशमुळे प्रोन्टो डार्क आधुनिक बाथरूम तसेच किचनमध्ये सहजपणे उठून दिसतो आणि जागेला अधिक आकर्षक व सुसंस्कृत लूक देतो. त्याची ५ लिटर क्षमता आणि जलद हीटिंग क्षमता दैनंदिन वापरासाठी आवश्यक आराम आणि सुविधा प्रदान करते. त्यामुळे आधुनिक शहरी घरांसाठी हा इन्स्टंट वॉटर हीटर उपयुक्त ठरतो. डिझाइनसोबतच




प्रोन्टो डार्क मध्ये सुरक्षिततेलाही महत्त्व देण्यात आले आहे. यामध्ये शॉक-प्रूफ बॉडी, फंक्शनल थर्मोस्टॅट, थर्मल कट-आउट आणि प्रेशर रिलीफ मेकॅनिझम यांसारख्या अनेक सुरक्षा वैशिष्ट्यांचा समावेश आहे. याच्या केंद्रस्थानी असलेल्या १२-बोल्ट सिस्टममुळे हे उपकरण ६.५ बार पर्यंतच्या पाण्याच्या दाबाचा सामना करण्यासाठी इंजिनिअर्स च्या माध्यमातून बनविण्यात आले आहे. त्यामुळे उंच इमारतींमधील घरांसाठीही ते योग्य असून दैनंदिन वापरासाठी अधिक विश्वासार्हता प्रदान करते. लाँचच्या निमित्ताने रॅकॉल्ड ने एक नवीन डिजिटल व्हिडिओ कॅम्पेन (डीव्हीसी) देखील सादर केले आहे. या डीव्हीसी च्या माध्यमातून उत्पादनाच्या डिझाइन-केंद्रित स्थानाला प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले आहे. वॉटर हीटरशी संबंधित पारंपरिक कार्यक्षमतेच्या पलीकडे जात,प्रोन्टो डार्क हे आधुनिक जीवनशैलीशी सहजपणे जुळणारे उपकरण म्हणून या कॅम्पेनमध्ये सादर करण्यात आले आहे—जिथे स्टाइल, आराम आणि कार्यक्षमता यांचा सुंदर मेळ साधला जातो.

या लाँचबाबत बोलताना मोहित नरुला व्यवस्थापकीय संचालक आणि कंट्री मॅनेजर – अरिस्टॉन ग्रुप इंडिया प्रा. लि. म्हणाले की “ग्राहकांची उपकरणे निवडण्याची पद्धत बदलत आहे. कार्यक्षमता आजही अत्यंत महत्त्वाची आहे; मात्र डिझाइन, सौंदर्यदृष्टी आणि एखादे उत्पादन घराच्या वातावरणाशी किती सहजपणे जुळते, यालाही खरेदीच्या निर्णयांमध्ये वाढते महत्त्व मिळत आहे. त्यामुळे ब्रँड्ससाठी पारंपरिक श्रेणीच्या अपेक्षांच्या पलीकडे जाण्याची महत्त्वाची संधी निर्माण झाली आहे. प्रोन्टो डार्क ५लि च्या माध्यमातून आम्ही हा विचार वॉटर हीटिंग श्रेणीत आणत आहोत. रॅकॉल्ड च्या इटालियन डिझाइन परंपरेचा आणि भारतीय ग्राहकांच्या बदलत्या गरजांचा मेळ आम्ही या उत्पादनातून साधला आहे. भारतातील आमच्या प्रीमियम पोर्टफोलिओला अधिक सक्षम करण्यासोबतच ग्राहकांसाठी अधिक मूल्य निर्माण करणारी वेगळी उत्पादने सादर करण्याच्या आमच्या व्यापक दृष्टिकोनाचा हा लाँच एक भाग आहे.”

■ इन्स्टंट वॉटर हीटर श्रेणीत स्टायलिश डिझाइनची भर

■ नवीन इन्स्टंट वॉटर हीटरमध्ये इटालियन डिझाइन, आकर्षक डार्क फिनिश आणि जलद वॉटर हीटिंगचा समावेश

■ आधुनिक जीवनशैलीचा अनुभव देणाऱ्या नव्या डीव्हीसी द्वारे उत्पादनाची वैशिष्ट्ये सादर

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

इ-निविदा सूचना
क्र.ना.औ.वि.कें/२०२६-२७/२६

| अ. क्र. | निविदा क्र./ विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) इसारा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | ३००००७२०६२ / सीएचपी | सीएचपी येथे बीडी १५५ बुलडोझर इंजिनची खरेदी. | ५४,९६,८८०/- / ५८,४२०/- |
| २. | ३००००७१८५१ / बीएम | संच क्र. ४ च्या ओव्हरहॉल दरम्यान ईएसपी इनलेट डक्टमध्ये सी.एफ.डी विश्लेषण, डक्ट फ्लो मापन चाचणी, डायव्हर्टर प्लेटस, हनीकॉम्ब आणि रिफ्रॅक्टरी यासह पॅच वेल्डिंगव्दारे नलिका गळती अटेंड करणे. | ३६,०३,३३२/- / ३९,५४०/- |
| ३. | ३००००६६८९० / बीएम | संच क्र. ४ कॅपिटल ओव्हरव्हॉल दरम्यान कास्टेबल रीफ्रेक्टरीचा पुरवठा. | १२,२०,२१५/- / १५,७५०/- |
| ४. | ३००००६६६३१ / ओडीपी | ओडीपी मधील सुटया भागांची संपुर्ण पुनर्बांधणी व नूतनीकरण करण्यासाठी कामाचा करार. | ८१,९०,०००/- / ८५,४००/- |
| ५. | ३००००७१९३३ / टीएम | संच क्र. ४ च्या सीओएचसाठी आवश्यक असलेल्या सीडब्लु पंपच्या डायनॅमिक बॅलेन्सिंगसह सुटे भागांची पुर्नरचना आणि दुरूस्ती (आवश्यक असल्यास). | ५८,५१,२१५/- / ६२,०००/- |
| ६. | ३००००७२०२२ / ओडीपी | संच क्र-४ सीओएच दरम्यान एसीबी (एस्बेस्टॉस सिमेंट बोर्ड) ड्रिफ्ट एलिमिनेटर आणि कूलिंग टॉवर्सचे काँक्रीट स्पेसर बदलण्यासाठी कामाचे कंत्राट | ३६,७१,३७३/- / ४०,२५०/- |
| ७. | ३००००७२०८७ / बीएम | संच ४ वार्षिक दुरूस्ती दरम्यान इएसपी आउटलेट पासून चिमणीच्या इनलेट पर्यंत फ्ल्यु गॅस वाहिनीच्या दुरूस्तीचे काम. | ११,३७,६४०/- / १४,८८०/- |
| ८. | ३००००७१९३० / ईएम | TMG मेक एलटी ब्रेकर्सच्या सर्व्हिसिंगसाठी कामाचा करार | ३,२६,२५०/- / ६,७२०/- |

नविन विक्रेते/ नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी.
अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.
प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/-, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक
औ.वि.केंद्र, एकलहरे

## थोडक्यात पण महत्वाचे



### मोशी कचरा डेपोवर आणखी सात गावांचा कचरा नको; ग्रामस्थांचा तीव्र विरोध

पिंपरी : दैनिक संध्या

मोशी कचरा डेपो येथे आणखी सात गावांचा कचरा आणून टाकण्याच्या प्रस्तावाला मोशी ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. मोशी परिसरावर आधीच कचरा व्यवस्थापनाचा मोठा भार असताना त्यात आणखी भर घालू नये, अशी मागणी नगरसेवक तथा 'क' क्षेत्रीय कार्यालय (विजयदुर्ग) सभापती निखिल बोऱ्हाडे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देऊन सात गावांचा कचरा मोशी येथे टाकण्याची कार्यवाही तात्काळ थांबवून पर्यायी जागा निश्चित करण्याची मागणी केली आहे. मोशी कचरा डेपो परिसरात यापूर्वीपासूनच पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागांमधून मोठ्या प्रमाणात कचरा आणला जातो. या परिसरात यापूर्वी गंभीर दुर्घटनाही घडली आहे. त्यामुळे कचरा डेपोच्या सुरक्षिततेचा तसेच परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर आणखी सात गावांचा कचरा मोशी येथे आणणे योग्य ठरणार नाही, अशी भूमिका बोऱ्हाडे यांनी निवेदनातून मांडली आहे. सात गावांचा कचरा मोशी येथे टाकण्याची कार्यवाही तात्काळ थांबवून, त्या गावांसाठी मोशीच्या बाहेर स्वतंत्र पर्यायी जागा निश्चित करावी. तसेच पर्यावरणपूरक आणि शास्त्रोक्त कचरा व्यवस्थापनाची व्यवस्था उभारावी, अशी स्पष्ट भूमिका निखिल बोऱ्हाडे यांनी निवेदनातून मांडली आहे. मोशी परिसरातील नागरिकांचे आरोग्य, पर्यावरण, नदी-नाले, वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील नागरी विकास या सर्व बाबींचा विचार करून प्रशासनाने या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने ग्रामस्थांच्या मागणीकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास नागरिकांच्या हितासाठी लोकशाही व कायदेशीर मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी दिला आहे. मोशीवरील कचऱ्याचा वाढता भार, नागरिकांचे आरोग्य आणि पर्यावरणाचा प्रश्न लक्षात घेता आता प्रशासन या निवेदनावर काय भूमिका घेते, याकडे मोशी ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. मोशी कचरा डेपोच्या जवळच सुमारे ८०० बेडचे रुग्णालय असून, परिसरात झपाट्याने नागरीकरण आणि लोकसंख्या वाढत आहे. अशा परिस्थितीत कचरा डेपोचा विस्तार अथवा अतिरिक्त कचरा आणल्यास हवा, पाणी, नदी-नाले आणि एकूणच पर्यावरणावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता असल्याचे बोऱ्हाडे यांनी म्हटले आहे. मोशी परिसरातील नागरिकांनी यापूर्वीच कचरा डेपोचा मोठा भार सहन केला आहे. त्यामुळे आता आणखी सात गावांचा कचरा मोशी येथे आणून टाकण्यास ग्रामस्थांचा ठाम विरोध आहे. विद्यमान कचरा व्यवस्थापनाच्या समस्या सोडविण्याऐवजी त्याच ठिकाणी अतिरिक्त कचरा आणणे हा परिसरातील नागरिकांवर अन्याय ठरेल, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे. महानगरपालिकेने प्रथम पिंपरी-चिंचवड शहरासाठी नियोजित कचरा प्रक्रिया प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावा. त्यानंतर भविष्यात निर्माण होणाऱ्या अतिरिक्त कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करण्यासाठी स्वतंत्र नियोजन करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

### दापोडीतील शून्य कचरा प्रकल्पाला उपमहापौर शर्मिला बाबर यांची भेट

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि वैष्णवी महिला बचत गटाच्या माध्यमातून दापोडी येथे राबविण्यात येत असलेल्या शून्य कचरा प्रकल्पाला उपमहापौर शर्मिला बाबर यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रकल्पाची संपूर्ण कार्यपद्धती आणि कचरा व्यवस्थापनाची प्रक्रिया जाणून घेतली. तसेच प्रकल्पात कार्यरत महिलांशी संवाद साधून त्यांच्या कामकाजाची माहिती घेत त्यांच्या अडचणीही जाणून घेतल्या. यावेळी सहाय्यक आरोग्य निरीक्षक राजेश भाट, अंकुश झिटे, मुख्य आरोग्य निरीक्षक उद्धव डवरी, आरोग्य निरीक्षक ओंकार शिवरकर, प्रभारी आरोग्य निरीक्षक उमेश जाधव, समाज विकास विभागाच्या समूह संघटिका वैशाली लगडे, योजक संस्थेच्या सिनिअर मॅनेजर सेजल जोशी यांच्यासह प्रकल्पात कार्यरत महिला उपस्थित होत्या. महानगरपालिकेच्या समाज विकास विभाग, आरोग्य विभाग आणि पर्यावरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. वैष्णवी महिला बचत गटातील सात महिला या प्रकल्पाचे कामकाज सांभाळत आहेत. या माध्यमातून कचऱ्याचे शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन करण्याबरोबरच महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. या प्रकल्पामध्ये संकलित केलेल्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून सेंद्रिय खत तयार केले जाते. तसेच प्लास्टिक कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून बेंच, पेव्हिंग ब्लॉक यांसारख्या विविध उपयुक्त वस्तू तयार करण्यात येतात. त्यामुळे कचऱ्याचा पुर्नवापर आणि पुर्ननिर्मितीला चालना मिळत असून परिसरातील स्वच्छताही राखली जात आहे. शून्य कचरा प्रकल्पामुळे परिसरातील कचऱ्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होत असून कचरा वाहतूक करून मोशी येथील कचरा डेपोवर टाकण्याचा भारही कमी होतो. स्थानिक पातळीवरच कचऱ्यावर प्रक्रिया होत असल्याने कचरा व्यवस्थापन अधिक परिणामकारक होण्यास मदत होत आहे. त्याचबरोबर या उपक्रमातून बचत गटातील महिलांना नियमित रोजगार व आर्थिक उत्पन्न मिळत असून त्यांच्या आर्थिक स्थितीतही सकारात्मक बदल होत आहे.

### PRO विभागाच्या निविदांवर गंभीर आक्षेप

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत राबविण्यात आलेल्या फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी तसेच 'सिटी हब फॉर डेटा अँड कम्युनिकेशन' (CHDC) प्रकल्पातील निविदा प्रक्रियेबाबत गंभीर आक्षेप उपस्थित करण्यात आले आहेत. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी नगरसेवक विनोद नढे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनानुसार, २०१८-१९ मधील फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी निविदेत मे. दर्शन डिजिटल यांना सुमारे २० लाख ८३ हजारांचे काम देण्यात आले होते. मुदत संपल्यानंतर तत्कालीन आयुक्तांनी ३ मार्च २०२१ रोजी "Call fresh tender, no extension is allowed" असा आदेश दिल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, नवीन निविदा प्रक्रिया रखडल्याने जुन्याच कंत्राटदाराकडून काम सुरू ठेवण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

# गोल्डमॅनच्या 'गोल्डन कार'वर पोलिसांची कारवाई

## काळ्या काचा आणि फॅन्सी नंबर प्लेट भोवल्या

■ पिंपरी : (दै. संध्या)

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात पिंपरी चिंचवड वाहतूक पोलिसांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेत एका 'गोल्डमॅन'च्या चर्चित गोल्डन कारवर कारवाई करण्यात आली. वाहनाला काळ्या फिल्म लावणे तसेच निर्धारित HSRP (हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट) ऐवजी फॅन्सी नंबर प्लेटचा वापर केल्याचे आढळून आल्याने पोलिसांनी ही कारवाई केली.

हिंजवडी वाहतूक विभागाकडून सध्या वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर धडक कारवाई सुरू आहे. या कारवाईदरम्यान पोलिसांच्या नजरेस एक आकर्षक गोल्डन रंगाची कार पडली. तपासणी केली असता वाहनाच्या काचांवर काळी फिल्म लावण्यात आल्याचे तसेच वाहनावर नियमानुसार HSRP नंबर प्लेट नसून फॅन्सी नंबर प्लेट लावण्यात आल्याचे निदर्शनास आले.

यानंतर पोलिसांनी तत्काळ वाहनावरील काळी फिल्म काढून टाकली आणि संबंधित वाहन चालकाविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई केली. वाहतूक नियमांचे पालन करणे सर्व वाहनचालकांसाठी बंधनकारक असून फॅन्सी नंबर प्लेट, काळ्या काचा आणि इतर बेकायदेशीर बदलांविरोधात अशी कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. वाहतूक पोलिसांनी नागरिकांना वाहनांवर नियमबाह्य बदल टाळण्याचे आणि शासनाने निर्धारित केलेल्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.



**पोलिसांचा इशारा**

वाहतूक नियमांचे पालन करणे सर्व वाहनचालकांसाठी बंधनकारक असून फॅन्सी नंबर प्लेट, काळ्या काचा आणि इतर बेकायदेशीर बदलांविरोधात अशी कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## गणेशोत्सवाच्या निमित्ताने युवा मोर्चा टीमचा स्नेहदर्शन उपक्रम


■ पिंपरी (दै. संध्या)

गणेशोत्सवाच्या पावन पर्वानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा, पिंपरी-चिंचवड शहर यांच्या वतीने युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांच्या घरी भेट देऊन घरगुती श्री गणरायाचे दर्शन घेण्यात आले.

युवा मोर्चाचे शहर उपाध्यक्ष मयुरजी काळभोर, शहर उपाध्यक्षा देवयानीताई भिंगारकर सोमन, उपाध्यक्ष मनोजजी माळी तसेच मंडल अध्यक्ष विवेकजी बारोट यांच्या निवासस्थानी भेट देऊन श्री गणपती बाप्पांचे मनोभावे दर्शन घेतले.

या प्रसंगी भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष दिनेशजी यादव, प्रदेश सचिव अजितजी कुलथे, उपाध्यक्ष मयुरजी काळभोर, मनोजजी घोडेकर, मंडल अध्यक्ष ऋषिकेश भालेकर तसेच विद्यार्थी संयोजक अध्यक्ष प्रतीकजी रामगुडे उपस्थित होते.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून युवा मोर्चाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये स्नेह, आपुलकी आणि संघटनात्मक एकात्मता अधिक दृढ होत आहे. श्री गणरायाच्या आशीर्वादाने समाजसेवेचा संकल्प अधिक बळकट व्हावा, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



## स्थायी समितीच्या बैठकीत विकासकामांना हिरवा कंदील

■ पिंपरी(दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीच्या साप्ताहिक बैठकीत शहराच्या विकासाशी संबंधित तसेच नागरिकांच्या सोयी-सुविधांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या विविध प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जंगम, विक्रांत बगाडे, तृप्ती सांडभोर, समिती सदस्य आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत पाणीपुरवठा, जलनिःसारण, दिव्यांग कल्याण, सार्वजनिक वाहतूक, महिला सुविधा, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. नवी सांगवी परिसरात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या कामास मंजुरी देण्यात आली.

तसेच जलनिःसारण विभागामार्फत नलिकांची आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे देखभाल व दुरुस्ती करण्याच्या प्रस्तावालाही हिरवा कंदील मिळाला. मोरवाडी येथील सुमारे २४ हजार चौरस फूट क्षेत्रफळाच्या दिव्यांग भवनात विविध प्रकारच्या दिव्यांग नागरिकांसाठी थेरपी, समुपदेशन, फिजिओथेरपी, हायड्रोथेरपी, स्पीच थेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, कौशल्य विकास व व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, ऑडिटोरियम आणि ग्रंथालय उभारण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत 'क' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत महिला बचत गटामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'झिरो वेस्ट' प्रकल्पाला मुदतवाढ देण्यात आली.

## मनोज जरांगे पाटील यांचे पिंपरी चिंचवडमध्ये जोरदार स्वागत होणार

■ पिंपरी(दै. संध्या)

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील हे लवकरच पिंपरी-चिंचवड शहरात येणार असून त्यांच्या स्वागतासाठी सकल मराठा समाजाने जोरदार तयारी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, पिंपरी येथे तातडीची नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला शहरातील मराठा समाजाचे पदाधिकारी, समन्वयक, युवक कार्यकर्ते तसेच महिला प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत मनोज जरांगे पाटील यांच्या दौऱ्याचे नियोजन, स्वागताची रूपरेषा, मार्ग निश्चिती तसेच कायदा व सुव्यवस्थेचे पालन करत कार्यक्रम शिस्तबद्ध पद्धतीने यशस्वी करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, शुक्रवार (दि. १८ सप्टेंबर) रोजी दुपारी ३ वाजता वाकड येथील भुजबळ चौक, हिंजवडी उड्डाणपुलाखाली, पुणे-बेंगळुरू महामार्गावर मनोज जरांगे पाटील यांचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. हा स्वागत सोहळा ऐतिहासिक आणि अभूतपूर्व करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी वक्त्यांनी मराठा समाजाची एकजूट, शिस्त आणि शांततेची परंपरा जपत हा दौरा यशस्वी करण्याचे आवाहन केले. तसेच दौऱ्याची माहिती शहरातील तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी सोशल मीडिया, पत्रके आणि विविध माध्यमांतून व्यापक जनजागृती करण्यावर भर देण्यात आला. बैठकीला पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील सकल मराठा समाजाचे आजी-माजी पदाधिकारी, तरुण कार्यकर्ते आणि महिला प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## न्यायाधीशांची पिंपरी-चिंचवड न्यायालयांना प्रथमच भेट..!

■ पिंपरी (दै. संध्या)

पुणे जिल्ह्याच्या नव्याने नियुक्त झालेल्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. श्रीमती ए. एस. शेंडे यांनी प्रथमच पिंपरी-चिंचवड शहरातील मोरवाडी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, नेहरूनगर दिवाणी न्यायालय तसेच मोशी येथील प्रस्तावित न्यायसंकुलाच्या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी मोरवाडी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाच्या प्रमुख मा. श्रीमती एस. एस. नायर यांचीही उपस्थिती होती.

मोरवाडी न्यायालयाच्या भेटीदरम्यान मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीशांनी न्यायालयीन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. उपलब्ध जागा, प्रलंबित प्रकरणे, न्यायालयीन कामकाजातील अडचणी, मनुष्यबळ तसेच पायाभूत सुविधांबाबत संबंधित अधिकारी व न्यायालयीन कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली. यावेळी निदर्शनास आलेल्या समस्यांबाबत तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या.



नेहरूनगर येथील दिवाणी न्यायालयाचीही त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. शहरातील न्यायालयीन कामकाजासाठी उपलब्ध जागा अपुरी असल्याने न्यायालयाच्या शेजारील इमारतीची पाहणी करण्यात आली. या इमारतीचा न्यायालयीन कामकाजासाठी कशा पद्धतीने उपयोग करता येईल, याबाबतच्या शक्यता पडताळण्यात आल्या. यावेळी पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे सचिव ॲड. उमेश खंदारे यांनी न्यायालयीन कामकाजातील अडचणी, वकील व पक्षकारांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या तसेच उपलब्ध जागा व पायाभूत सुविधांबाबत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीशांना सविस्तर माहिती दिली. पिंपरी-चिंचवड शहरासाठी दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तराची आणखी दोन न्यायालये मंजूर झालेली असून, त्यांची कार्यवाही सुरू करण्यासाठी आवश्यक जागा व पायाभूत सुविधांची उपलब्धता तपासण्यात येत आहे. तसेच शहरासाठी स्वतंत्र मोटार वाहन न्यायालय मंजूर झालेले असले तरी जागेअभावी त्याची सुरुवात अद्याप झालेली नाही.

# पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६" शहराच्या सांस्कृतिक वैभवाचा भव्य उत्सव ठरणार..!

■ पिंपरी (दै. संध्या)

कला, साहित्य, संगीत, संस्कृती आणि पिंपरी-चिंचवड शहराच्या समृद्ध परंपरेचा उत्सव साजरा करणाऱ्या 'पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६' संदर्भात आज महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधून महोत्सवाची रूपरेषा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, कलाकारांचा सहभाग तसेच पुरस्कार सोहळ्याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

शहरातील कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, साहित्यिक व सांस्कृतिक चळवळीला नवी ऊर्जा मिळावी तसेच कला, साहित्य, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक यांसह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या गुणवंतांचा गौरव व्हावा, हा या महोत्सवाच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे.

दि.१८ ते २० सप्टेंबर २०२६ या कालावधीत आयोजित या त्रिदिवसीय सांस्कृतिक पर्वात विविध कलाविष्कार, नामवंत कलाकारांचे कार्यक्रम, साहित्यिक उपक्रम, संगीत, लोककला तसेच विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा सन्मान अशा विविध कार्यक्रमांची मेजवानी नागरिकांना अनुभवता येणार आहे. पिंपरी-चिंचवड शहराची सांस्कृतिक अस्मिता, कलावैभव आणि सर्जनशीलता अधोरेखित करणारा हा महोत्सव ठरणार आहे.

शहरातील कलाकार, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि गुणवंतांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच नागरिकांना दर्जेदार कलाविष्कारांचा अनुभव घेता यावा, या दृष्टीने महोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. शहरातील नागरिकांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने सहभागी होऊन या सांस्कृतिक पर्वाचा आनंद घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.



पत्रकार परिषदेस आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, कला, क्रीडा, सांस्कृतिक व पर्यटन समितीचे सभापती कैलास कुटे आणि नगरसदस्य राहुल कलाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

"पिंपरी-चिंचवड शहर हे केवळ औद्योगिक नगरी म्हणून नव्हे, तर कला, साहित्य, संगीत आणि संस्कृतीची समृद्ध परंपरा जपणारे शहर म्हणूनही आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहे. स्थानिक कलाकार, साहित्यिक आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे आणि नागरिकांना दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांचा अनुभव घेता यावा, या उद्देशाने 'पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागातून हा महोत्सव शहराच्या सांस्कृतिक वाटचालीतील संस्मरणीय पर्व ठरेल," असे स्वागताध्यक्ष तथा महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

"पिंपरी-चिंचवडमध्ये कला, साहित्य, संगीत, नाट्य आणि लोककलेच्या क्षेत्रात मोठी प्रतिभा आहे.

या प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवोदित कलाकारांना आपली कला सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी अशा महोत्सवांची आवश्यकता आहे. 'पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६'च्या माध्यमातून स्थानिक कलाकारांसोबत विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा गौरव होणार असून शहराच्या सांस्कृतिक चळवळीला अधिक बळ मिळेल," असे मुख्य संयोजक तथा आमदार अमित गोरखे यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### मॉडेल स्कूल आंबेठाण मध्ये भौतिक सुविधांसाठी एक कोटी रुपयांचा निधी

**चाकण : दैनिक संध्या**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत मॉडेल स्कूल आंबेठाण मध्ये एक कोटी रुपये निधीतून विविध भौतिक सुविधा निर्माण करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या सदस्या सुनीता बुट्टे पाटील यांनी दिली. पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, कृषी पशुसंवर्धन समितीचे सभापती अमोल नलावडे, व जिल्हा परिषदेच्या सदस्या सुनिता शरद बुट्टे पाटील, सदस्य गणेश बोत्रे आणि खेड पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते आदींच्या हस्ते या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी खेड पंचायत समितीच्या सदस्या श्रद्धा मांडेकर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विशाल शिंदे, गट शिक्षणाधिकारी अमोल जंगले, जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता हेमंत कुमार चौगुले, उपअभियंता श्रीकर येवले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन मांडेकर, केंद्रप्रमुख कालिदास सातकर, मुख्याध्यापक रोहिदास येळवंडे, मच्छिंद्र शेटे आदी उपस्थित होते. मॉडेल स्कूल आंबेठाण मध्ये कॉर्निंग इंडिया कंपनीच्या माध्यमातून जिम्नॅशियम हॉलचे काम सुरू आहे. संगणक लॅब, वाचनालय, मैदान शाळेची इमारत या कामाची यावेळी पदाधिकाऱ्यांनी पाहणी केली. नव्याने उपलब्ध झालेल्या निधीतून संपूर्ण शाळेच्या परिसराला वॉल कंपाऊंड आणि अतिशय सुसज्ज आणि भव्य असे प्रवेशद्वार उभारण्यात येणार आहे. तसेच शाळा वर्ग खोल्यांचे काम केले जाणार आहेत. आंबेठाण शाळेमध्ये ८८९ विद्यार्थी शिक्षण घेत असून, मोठ्या प्रमाणावर ती पटसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे.




### गणपती देखाव्यातून पुणे नाशिक रेल्वेची मागणी

**नारायणगाव: दैनिक संध्या**

जुन्नर तालुक्यातील पिंपरी पेंढार येथे गणेशोत्सवानिमित्त चारंगबाबा नवतरुण मित्र मंडळ, दुर्गुडेपट नं. १ यांच्या वतीने यंदा 'परिवर्तन एक्सप्रेस' या अभिनव संकल्पनेवर आधारित आकर्षक गणेशोत्सव देखावा साकारण्यात आला आहे. या देखाव्यातून रेल्वेच्या माध्यमातून होणारी कनेक्टिव्हिटी, आधुनिक विकास, शिक्षण, रोजगार, शेती आणि गावांच्या सर्वांगीण विकासाचा संदेश देण्यात आला आहे. 'परिवर्तन एक्सप्रेस' ही केवळ रेल्वेची प्रतिकृती नसून, विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करणाऱ्या नव्या भारताचे प्रतीक म्हणून साकारण्यात आली आहे. विशेषतः पुणे–नाशिक रेल्वेची गरज आणि त्यातून परिसराच्या विकासाला मिळणारी गती हा विषय देखाव्याच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. या देखाव्याची संकल्पना मांडणी संकेत देविदास विधाटे (Civil Engineer) यांनी केली असून, मंडळातील युवकांच्या एकत्रित मेहनतीतून या संकल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप देण्यात आले आहे. देखावा साकारण्यासाठी दत्तात्रय विधाटे, मयूर दुरगुडे, वेदांत कुटे, संस्कार दुर्गुडे, कुणाल विधाटे, रोहित गव्हाणे, निशांत दुर्गुडे, गोरक्षनाथ विधाटे, शुभम दुरगुडे, भूषण दुरगुडे अमित जाधव, अक्षय जोरी, कल्पेश दुरगुडे, मंदार विधाटे, ओंकार दुरगुडे, अनिकेत दुरगुडे, ऋषिकेश दुरगुडे, सुमित विधाटे, सिद्धेश दुर्गुडे आणि सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. मंडळाच्या युवकांनी कल्पकता, तंत्रज्ञान आणि सामाजिक संदेश यांचा सुंदर मेळ घालत हा देखावा साकारला असून, गणेशोत्सवाच्या माध्यमातून 'विकास हवा असेल तर परिवर्तनाची सुरुवात करावी लागेल' असा सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.



### स्वर्गीय एकनाथ काका प्रतिष्ठानतर्फे पिंपळे विद्यालयात २३५ विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**जेजुरी : दैनिक संध्या**

आचार्य प्र. के. अत्रे विद्यालय, पिंपळे येथे स्वर्गीय एकनाथ काका प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्या वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष काका जगताप यांच्या वतीने तसेच विद्यालयाचे माजी विद्यार्थी अमित पोमण यांच्या पाठपुराव्याने सुमारे २३५ विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. स्वर्गीय एकनाथ काका प्रतिष्ठान सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने मोलाचे कार्य करत असून, आतापर्यंत विद्यालयाला विविध शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी प्रतिष्ठानने सहकार्य केले आहे, असे मनोगत विद्यालयाचे मुख्याध्यापक रमेश जाधव यांनी व्यक्त केले. यावेळी संस्थेचे सचिव शांताराम बापू पोमण यांनी स्वर्गीय एकनाथ काका यांनी आपल्या काळात केलेल्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला. त्यांचा सामाजिक कार्याचा वसा व वारसा पुढे नेत संतोष काका जगताप सामाजिक क्षेत्रात कार्यरत असल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. संतोष काका जगताप यांनी आपल्या मनोगतात, "पिंपळे विद्यालयाला यापुढेही प्रतिष्ठानच्या माध्यमातून सातत्याने सहकार्य केले जाईल. विद्यालयातील विद्यार्थी ग्रामीण भागातील शेतकरी व मजूर कुटुंबातील असल्याने त्यांनी प्रतिष्ठानच्या विविध योजनांचा लाभ घेऊन शैक्षणिक, सामाजिक व कौटुंबिक प्रगती साधावी आणि विद्यालयाचे नाव उज्वल करावे," असे आवाहन केले. कार्यक्रमास अनिकेत पोमण यांच्यासह विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन सचिन धनवट, सुनील जायकर, शरद चौधरी, राजेंद्र दळवी, मीनल खेडेकर आणि नाना जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे आभार शहाजी पोमण यांनी मानले.

## 'चाळ' केवळ गणपतीचा देखावा नाही, तर हरवत चाललेल्या माणुसकीची आठवण

# सुंदर संकल्पनेतून साकारलेला अप्रतिम देखावा

■ **कोरेगावमुळ (दै. संध्या)**

'चाळ' केवळ गणपतीचा देखावा नाही, तर हरवत चाललेल्या माणुसकीची आठवण तेजस सुभाष साठे आर्किटेक्ट इंजिनिअर, S.S. Agro Foods कंपनीच्या अकाउंट आणि कंपनी डेव्हलपमेंट विभागाचा प्रमुख. कामाच्या व्यापामुळे सतत व्यस्त असणारा पण त्याचबरोबर भगवद्गीता, श्रीमद्भागवत आणि विविध संतवाङ्मयाचे आवडीने वाचन करणारा, शुद्ध शाकाहारी आणि अध्यात्मिक विचारांची ओढ असलेला मुलगा. संध्याकाळी आम्ही सर्वजण जेवायला एकत्र बसलो की, जेवणाबरोबरच चर्चा रंगते ती ग्रंथांची, संतांच्या विचारांची, समाजातील बदलांची आणि जीवनमूल्यांची. तेजस ग्रंथात काय लिहिले आहे, संतांनी काय सांगितले आहे, हे सांगत असतो आणि आम्ही सर्वजण मनापासून ऐकत असतो. अशाच एका चर्चेत पाच-सहा दिवसांपूर्वी तेजस म्हणाला 'आज समाजामध्ये तरुण-तरुणी आत्महत्या करत आहेत, लग्न झाल्यानंतर काही महिन्यांतच घटस्फोट होत आहेत. असं का घडतंय?' त्याच्या मते, आजच्या जीवनात प्रत्येकाला स्वतंत्रता आणि प्रायव्हसी हवी आहे पण त्याचवेळी एकमेकांची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी कमी होत चालली आहे. एखादी गोष्ट हवी असेल तर ती लगेचच मिळाली पाहिजे, नकार सहन होत नाही. घरातील माणसांकडे ती गोष्ट घेण्यासाठी पैसे आहेत की नाहीत, याचाही विचार अनेकदा केला जात नाही. एकाच घरात माणसं अनेक, पण प्रत्येकाचा मोबाईल स्वतंत्र प्रत्येकाच्या मोबाईलला पासवर्ड कोणाचाही फोन कोणी घ्यायचा नाही. फोन आला की घराबाहेर जाऊन बोलायचे. माणसं घरात एकत्र राहतात पण मनं मात्र किती दूर गेली आहेत. याच विचारातून तेजसने एक सुंदर कल्पना मांडली - आपल्या गणपतीच्या देखाव्यात पूर्वीची चाळ उभी करूया. पूर्वी लोक चाळीत राहत होते. जागा कमी



होती पण माणुसकीला जागा मोठी होती. एकाच्या घरात सुख आलं तर संपूर्ण चाळ आनंदी व्हायची आणि कोणाच्या घरात दुःख आलं तर संपूर्ण चाळ त्याच्या दुःखात सहभागी व्हायची. सुख-दुःख वाटून घेणारी माणसं होती. एकमेकांना आधार देणारे शेजारी होते. नात्यांमध्ये औपचारिकता नव्हती, तर आपलेपणा होता.

आणि म्हणूनच 'चाळ' हा केवळ गणपतीचा देखावा न राहता, आजच्या पिढीला एक संदेश देणारा विचार बनला. तेजसने चाळीचा देखावा तयार करण्याचे ठरवले आणि कामाला सुरुवात झाली. आमच्या थोरल्या सुनबाई अनुजा—महानुभाव पंथातील उच्चशिक्षित आणि अत्यंत संस्कारी. दुसरी सुनबाई तन्वी—उच्चशिक्षित, माळकरी संस्कारांच्या घराण्यातील आणि अत्यंत विनम्र. दोघींनीही तेजसच्या या संकल्पनेला मनापासून साथ दिली. गेल्या पाच-सहा दिवसांपासून रात्रीचे दोन-दोन वाजेपर्यंत जागून त्यांनी या देखाव्यावर मेहनत घेतली. चाळीतील प्रत्येक छोटासा भाग, प्रत्येक वस्तू, प्रत्येक कोपरा त्यांनी स्वतःच्या हाताने तयार केला आणि एकेक भाग जोडत एक सुंदर, जिवंत आणि भावपूर्ण चाळ उभी केली. या देखाव्याकडे पाहताना केवळ सजावट दिसत नाही दिसतो तो पूर्वीच्या एकत्र कुटुंबाचा आपलेपणा दिसते ती शेजारधर्माची भावना दिसते ती सुख-दुःखात एकमेकांच्या पाठीशी उभी राहणारी माणसं आज विकासाच्या नावाखाली आपण खूप पुढे आलो आहोत मोबाईल, तंत्रज्ञान, स्वतंत्र खोल्या आणि प्रायव्हसी मिळाली. पण या सगळ्या विकासाच्या प्रवासात आपण माणसांपासून, नात्यांपासून आणि एकमेकांच्या सुख-दुःखापासून दूर तर जात नाही ना? हा प्रश्न हा देखावा नकळत आपल्याला विचारतो. तेजसची विचारधारा आणि अनुजा-तन्वीची अथक मेहनत यामुळे साकारलेली ही चाळ म्हणजे आमच्यासाठी गणपती बाप्पाच्या चरणी अर्पण केलेली एक सुंदर कलाकृतीच नव्हे, तर हरवत चाललेल्या माणुसकीची आणि जुन्या नात्यांची जपणूक करण्याचा छोटासा प्रयत्न असल्याचे मत माजी सरपंच सुभाष साठे यांनी सांगितले.

## 'अनेकान्त'मध्ये हिंदी दिन उत्साहात साजरा !

■ **राजगुरुनगर (दै. संध्या)**

बारामती येथे हिंदी दिनाच्या औचित्याने हिंदी विभागाच्या वतीने "भाषा व्याकरणाचा मेळा" या विषयावर एका विशेष हिंदी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेबद्दल आवड आणि प्रेम निर्माण करणे तसेच व्याकरण अधिक सर्जनशील व रंजक पद्धतीने समजून सांगणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे (बारामती) हिंदी विभाग प्रमुख डॉ. सरवदे प्रदीप रेवाप्पा उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रदर्शनाची पाहणी केली आणि विद्यार्थ्यांना हिंदी भाषेचे महत्त्व तसेच उज्ज्वल भविष्यासाठी हिंदी अभ्यासाची उपयुक्तता यावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध मॉडेल्स, चार्ट्स, पोस्टर्स आणि हिंदी साहित्याशी संबंधित सादरीकरणे केली. तसेच त्यांनी आपल्या प्रकल्पांची माहिती अत्यंत आत्मविश्वासाने दिली. विद्यालयाच्या प्राचार्या प्रणाली वडेर आणि सर्व शिक्षकवृंदाने प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या या सुंदर प्रयत्नांचे कौतुक केले. हिंदी विभागाच्या शिक्षिका आणि विद्यालयातील सर्व सहकाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. हा सोहळा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत ज्ञानवर्धक, सर्जनशील आणि प्रेरणादायी ठरला.




## नवज्योत सार्वजनिक गणेशोत्सवाची उत्साहपूर्ण सुरुवात

■ **कवठे येमाई (दै. संध्या)**

कवठे येमाई सहकारी सोसायटी समोरील भव्य प्रांगणात 'नवज्योत सार्वजनिक गणेशोत्सव २०२६' ला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली असून, मंडळाच्या वतीने दि. १४ ते २५ सप्टेंबरदरम्यान विविध धार्मिक, सांस्कृतिक, मनोरंजनात्मक व विद्यार्थ्यांसाठीच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहेत.

उत्सवाची सुरुवात दि. १४ सप्टेंबर रोजी श्री गणेशमूर्तीची भव्य मिरवणूक व प्राणप्रतिष्ठापनेने झाली. त्यानंतर पुढील दिवसांत लहान मुलांसाठी वन मिनिट स्पर्धा व खेळ, महिलांसाठी संगीत खुर्ची, तसेच जादूगाराचा कार्यक्रम, हिप्नोटिझम, रेकॉर्ड डान्स स्पर्धा, भव्य गायनाचा कार्यक्रम आणि 'होम मिनिस्टर' यांसारख्या आकर्षक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शालेय हस्ताक्षर स्पर्धा व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २४ सप्टेंबर रोजी सत्यनारायण महापूजा व महाप्रसाद, तर दि. २५ सप्टेंबर रोजी श्री गणेशाची भव्य दिव्य विसर्जन मिरवणूक



व प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच उत्सवादरम्यान दररोज रात्री १० ते ११ या वेळेत नवज्योत रास दांडिया होणार असून, विविध कार्यक्रमांमुळे गणेशपेठ परिसरात भक्ती, कला आणि मनोरंजनाचा रंग चढणार आहे."आपला मोलाचा सहभाग या उत्सवात घ्यावा," असे आवाहन नवज्योत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## हरवलेले मोबाईल मूळ मालकांच्या स्वाधीन, खेड पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

■ **राजगुरुनगर (दै. संध्या)**

खेड पोलीस स्टेशनच्या हद्दीत हरवलेले व गहाळ झालेले मोबाईल शोधून खेड पोलिसांनी मूळ मालकांना स्वाधीन केले आहे. एकूण ९ लाख रुपये किंमतीचे २५ मोबाईल फोन विविध जिल्ह्यांतून शोधून हस्तगत करण्यात खेड पोलिसांना मोठे यश आले आहे. या वेळी मोबाईल मिळाल्याचा आनंद नागरिकांच्या चेहऱ्यावर दिसून आला. नागरिकांनी खेड पोलिसांच्या या कामगिरीचे कौतुक करीत आभार मानले. खेड पोलीस स्टेशन येथे दाखल झालेल्या मोबाईल गहाळ झाल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. CEIR पोर्टलच्या मदतीने मोबाईलची माहिती व तांत्रिक बाबींचे विश्लेषण करून वेगवेगळ्या जिल्ह्यांतून २५ मोबाईल शोधून ते ताब्यात घेतले.

ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे तसेच प्रभारी पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या



पथकात सहायक पोलीस निरीक्षक सचिन राऊळ, पोलीस हवालदार संतोष घोलप, पोलीस अंमलदार महेश गोसावी व सुरज राक्षे यांचा समावेश होता.१मोबाईल चोरी, गहाळ तक्रारीचा तांत्रिक पद्धतीने बारकाईने तपास केला जात आहे. CEIR पोर्टल व सायबर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मोबाईलचा माग काढून तो कोणत्याही जिल्ह्यात, राज्यात असला तरी शोधून काढण्याची कारवाई यापुढेही सुरूच राहणार आहे. नागरिकांनी मोबाईल हरवल्यास तातडीने पोलिसांकडे तक्रार नोंदवावी; पोलिसांच्या तपास यंत्रणेवर विश्वास ठेवावा.

## डेक्कन एज्युकेशन इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी केले सामूहिक अथर्वशीर्ष पठण

■ **शिरूर (दै. संध्या)**

हलवाई चौक गणेश मित्र मंडळाच्या हलवाई गणेशासमोर डेक्कन एज्युकेशन इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण केले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भक्तिमय उपक्रमामुळे परिसरात चैतन्यपूर्ण आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही हलवाई गणेशासमोर विद्यार्थ्यांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण केले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मंडळाच्या वतीने अल्पोपहार देण्यात आला. डेक्कन स्कुलचे प्राचार्य डॉ. समीर ओंकार यांनी अथर्वशीर्षाचे महत्त्व व महती विशद करून शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष मयूर काळे उपाध्यक्ष वैभव लांडे, शरद मुसळे, मंडळाचे माजी अध्यक्ष रणजीत गायकवाड, अशोक काळे, प्रेम मुसळे,श्याम परदेशी, अविनाश जाधव, प्रणव मुसळे, बाळासाहेब ढोबळे ,सिंकदर




मन्यार रमणलाल मुसळे, नारायण काळे, श्याम कोळपकर , शिक्षक सखाराम पुरी, आदी उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत मंडळाचे अध्यक्ष मयूर काळे यांनी केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. सतीश धुमाळ यांनी केले. आभार अशोक काळे यांनी मानले. हलवाई चौक गणेश मित्र मंडळाने धार्मिक उत्सवाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम सातत्याने राबविले आहेत. काही वर्षांपूर्वी मंडळाने विसर्जन मिरवणूक साध्या पद्धतीने काढून वाचलेल्या निधीतून परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविले. मंडळाचा उत्सव मंडप खड्डेविरहित ठेवण्याची परंपराही कायम आहे. शहरात महिलांसाठी सामूहिक महिला आरतीचा उपक्रम सर्वप्रथम मंडळाने सुरू केला. पर्यावरण संवर्धनासाठी महिला आरतीच्या वेळी महिलांना तुळशीची तसेच देशी वृक्षांची रोपे भेट देण्यात येतात. वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांना पुस्तके वाटली जातात. गणेशोत्सव काळात बंदोबस्त व स्वच्छतेची जबाबदारी पार पाडणाऱ्या पोलिस व नगरपरिषद स्वच्छता कर्मचाऱ्यांचा कृतज्ञता सोहळ्यातून सन्मान केला जातो. आरोग्य शिबिरे, जनजागृती, स्वच्छता अभियान, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश वाटप असे उपक्रमही राबविले जातात. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना 'प्रेरणादायी शिक्षक' पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

# धारीवाल यांच्या हस्ते मोफत रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा संपन्न

■ **शिरूर (दै. संध्या)**

गणेश भक्तांसाठी मोफत रुग्णवाहिका लोकार्पण नगरीचेनेते व दानशूर उद्योजक प्रकाशभाऊ धारीवाल यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी शिरूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे व उपनगराध्यक्ष मितेश गादिया यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रकाशभाऊ धारिवाल म्हणाले कि, गणेश मंडळानी वायफळ खर्च न करता असे लोकोपयोगी उपक्रम रबावले त्याबद्दल प्रभागातील सर्व मंडळाचे व स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे विशेष कौतुक वाटते. नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे म्हणाल्या, प्रभाग दोनमध्ये कायम नवनवीन उपक्रम राबवले जातात. आज होणाऱ्या मोफत रुग्णवाहिकेच्या उपक्रमाबद्दल गणेश मंडळे व नगरसेविका जामदार यांचे विशेष कौतुक केले पाहिजे. नगरसेविका सौ स्वप्नाली जामदार म्हणाल्या "गणेश उत्सव काळात काही आपत्कालीन प्रसंग निर्माण झाल्यास तत्काळ रुग्णवाहिका उपलब्ध व्हावी या हेतूने मोफत रुग्णवाहिका लोकार्पण करण्यात आले.व प्रभागातील सर्व मंडळाना सोबत



घेऊन हा उपक्रम रबावला जात आहे." शिरूर मधील प्रभाग हा कायम आपल्या वैविध्यपूर्ण उपक्रमासाठी ओळखला जातो. स्थानिक दोनच्या नगरसेविका स्वप्नाली योगेश जामदार यांच्या संकल्पनेतून या भागात अनेक लोकोपयोगी उपक्रम राबवले जात असून याचा उपयोग नागरिकांना होत असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

यावेळी अभिजित पाचर्णे,नगरसेवक रवींद्र ढोबळे,सभापती सुनिल जाधव,मा नगरसेवक मुज्जफर कुरेशी,सचिन धाडीवाल,मुन्नाभाई शेख,मा.शिक्षण सभापती तुकाराम खोले,भूमिपुत्र प्रतिष्ठानचे सुशांत कुटे,डॉ. संतोष पोटे,गणेश कोळपकर,बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड.विकास बापू फडतरे,डॉ वैशाली साखरे,शितल शर्मा,अॅड.प्रदीप बारवकर,अॅड.रविंद्र खांडरे,पत्रकार संतोष शिंदे,प्रविण गायकवाड,प्रा.सतीश धुमाळ,अविनाश घोगरे, पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### हवेली तालुक्यातील विविध विकासकामांचे आमदार कटके यांच्याहस्ते भुमिपुजन

**लोणी काळभोर : दैनिक संध्या**

पंचायत समिती हवेली तसेच इतर विविध माध्यमातून मंजूर झालेल्या हवेली तालुक्यातील विविध विकासकामांचा भूमिपूजन समारंभ रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी आमदार ज्ञानेश्वर माऊली कटके व बापूसाहेब पठारे यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडला. या भूमिपूजन कार्यक्रमांतर्गत आव्हाळवाडी, मांजरीखुर्द, कोलवडी, थेऊर, कुंजीरवाडी, उरुळीकांचन, लोणी काळभोर व कदमवाकवस्ती या गावातील विविध विकासकामांचे काल नारळ फोडण्यात आले. हवेली तालुक्यातील ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, स्वच्छता, पायाभूत सुविधा आणि पालखी मार्गांच्या विकासावर विशेष भर देण्यात आला आहे. हवेली तालुक्याच्या प्रत्येक गावातील नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करून, नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हवेली पंचायत समिती कटिबद्ध असून, आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या मार्गदर्शनाखाली हवेली तालुक्याच्या प्रत्येक गावागावात विकासगंगा पोहोचविण्याच्या प्रयत्न करणार असल्याचे, सभापती युवराज हिरामण काकडे यांनी सांगितले. यावेळी आमदार ज्ञानेश्वर कटके, आमदार बापूसाहेब पठारे, सभापती युवराज काकडे, उपसभापती विद्या गायकवाड, पंचायत समितीचे सदस्य सुदर्शन चौधरी, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दिलीप वाल्हेकर, सहायक गटविकास अधिकारी शिवाजी नागवे, उपअभियंता निरंजन जाधव, पंचायत समितीचे माजी सदस्य हिरामण काकडे, माजी उपसभापती हेमलता बडेकर, भाऊसाहेब तुपे, सुभाष बगाडे, सुनील तांबे, रामभाऊ तुपे, तसेच सर्वच गावचे प्रशासक सरपंच उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पीएम सूर्यघर व 'स्मार्ट' योजनेची माहिती आता तालुका पातळीवर

**मुंबई: दैनिक संध्या**

केंद्र सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा सेतू कॅम्प'चे विशेष आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेअंतर्गत 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजना' आणि 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट)' योजनेची माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी महावितरण तालुका पातळीवर विशेष 'किओस्क' उभारणार आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सर्व तालुका पातळीवर हे किओस्क उभारण्याचे निर्देश दिले आहेत. या किओस्कच्या माध्यमातून ग्राहकांना रूफटॉप सौर ऊर्जा योजनांचा लाभ घेण्याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाईल. किओस्कमध्ये सौर योजनेसाठी ऑनलाईन अर्ज कसा करावा, याचे थेट प्रात्यक्षिक व मार्गदर्शन महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून केले जाईल.विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे ग्राहकांना घटनास्थळीच ऑनलाईन अर्ज भरण्यासोबतच सोलर सिस्टीमसाठी लागणाऱ्या बँक कर्जासाठीही अर्ज करता येईल. 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजना' आणि 'स्मार्ट' योजनेची सविस्तर माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. नागरिकांनी महावितरणच्या या उपक्रमाचा आणि सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरण प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या राष्ट्रीय परिषदेस मा.खा. पद्मविभूषण शरद पवार साहेब राहणार उपस्थित

**पुणे : दैनिक संध्या**

जागरूक ग्राहक हीच सक्षम समाजाची ओळख" या विचाराला केंद्रस्थानी ठेवत ग्राहक संरक्षण आणि जनजागृतीचा व्यापक संदेश देणाऱ्या राष्ट्रीय परिषदेचा समारोप ज्येष्ठ नेते मा.खा.शरदचंद्रजी पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. अखिल भारतीय ग्राहक पंचायत आणि ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या राष्ट्रीय परिषदेत राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य, क्षेत्रीय संघटन आणि सह संघटन मंत्री याशिवाय देशभरातुन ग्राहक चळवळीतील कार्यकर्ते, तज्ञ, अभ्यासक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी होणार आहेत. बदलत्या काळानुसार ग्राहकांच्या गरजा व समस्या याचे स्वरूपही झपाट्याने बदलत आहे. डिजिटल व्यवहार, ई कॉमर्स, वस्तू व सेवांची गुणवत्ता, ग्राहकांची फसवणूक आणि तक्रारींचे निवारण अशा विविध विषयांवर परिषदेत सखोल विचारमंथन करण्यात येणार आहे. ग्राहकांनी आपल्या हक्कांबरोबरच कर्तव्याचीही जाणीव ठेवून सजग आणि जबाबदार नागरिक म्हणून पुढे यावे, हा या परिषदेचा प्रमुख उद्देश आहे. ग्राहक संरक्षणाची चळवळ केवळ काही व्यक्ती किंवा संस्थांपूरती मर्यादित न राहता ती समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्याची गरज यावेळी अधोरेखित केली जाणार आहे. आधुनिक डिजिटल युगात ग्राहकांसमोरील नव्या आव्हानांचा वेध घेतानाच ग्राहकांचे हक्क जबाबदाऱ्या आणि सक्षम ग्राहक चळवळीची गरज यावरही सविस्तर चर्चा होणार आहे. ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट कृषी, शिक्षण, ग्रामीण विकास आणि सामाजिक परिवर्तनासाठी अग्रेसर आहे. मागील पन्नास वर्षांपासून संस्था सातत्याने वैविध्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृतीचे उद्दिष्ट पूर्ण करीत आहे. या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय ग्राहक पंचायत आणि ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या राष्ट्रीय परिषदेचे विशेष महत्त्व आहे. ग्राहक चळवळीला नवी दिशा आणि व्यापक सामाजिक अधिष्ठान मिळण्यास या परिषदेची निश्चितच मोलाची भूमिका ठरणार आहे, असे संस्थेचे चेअरमन मा. राजेंद्र दादा पवार यांनी सांगितले. मा. खा.शरदचंद्रजी पवार यांच्या उपस्थितीमुळे समारोप सोहळ्याला वैचारिक आणि सामाजिक महत्त्व प्राप्त होणार असून त्यांच्या मार्गदर्शनातून ग्राहक संरक्षण, सामाजिक बांधिलकी आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी कार्य करण्याची नवी प्रेरणा मिळणार आहे. अखिल भारतीय ग्राहक पंचायत आणि ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने होणारी ही राष्ट्रीय परिषद एक जागरूक ग्राहक, सक्षम समाज आणि पारदर्शक व्यवहार या दिशेने पुढील वाटचालीचा संकल्प घेऊन विकासात्मक वाटचाल करणार आहे.

# कृषी पायाभूत सुविधांसाठी एक हजार रुपयांहून अधिक गुंतवणुकीच्या संधी

## पणन मंत्री जयकुमार रावल : मॅग्नेट ॲग्रीबिझनेस इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टर मीट'चे पणनमंत्री रावल यांच्या हस्ते दिमाखदार उद्घाटन

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राला केवळ कृषी उत्पादन करणारे राज्य न ठेवता कृषीमालाचे मूल्यवर्धन, प्रक्रिया आणि निर्यात करणारे आघाडीचे राज्य बनविण्यासाठी 'मॅग्नेट २.०'च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आधुनिक कृषी पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. केळी, डाळिंब, आंबा, लिंबूवर्गीय फळे, काजू आणि हळद या सहा कृषी उत्पादनांच्या समूहांसाठी एक हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीची संधी निर्माण केली जाणार असून, खासगी क्षेत्राने या प्रक्रियेत भागीदार म्हणून सहभागी व्हावे, असे आवाहन पणन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी केले.

मुंबई येथे आयोजित 'मॅग्नेट ॲग्रीबिझनेस इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टर मीट'मध्ये ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे संचालक आमदार चरणसिंह ठाकूर,

मुख्यमंत्र्यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार आणि 'मित्रा'चे मुख्या कार्यकारी अधिकारी प्रवीण सिंह परदेशी, पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, शासनाचे राजशिष्टाचार, परकीय थेट गुंतवणूक, प्रवासी भारतीय व्यवहार व जनसंपर्क विभागाचे सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी डॉ. राजेश गवांदे, पणन संचालक तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक तथा मॅग्नेट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे

आशियाई विकास बँकेचे संचालक ताकेशी उएडा, क्रिशन. रोतेला यांच्यासह वेगवेगळ्या देशांचे महावाणिज्यदूत उपस्थित होते.

कृषी क्षेत्रातील गुंतवणूक, पायाभूत सुविधा, मूल्यवर्धन, रोजगारनिर्मिती आणि शेतकऱ्यांना अधिक मूल्य मिळवून देणे, या सर्व बाबी एकत्रितपणे पुढे नेण्याची गरज असल्याचे मंत्री श्री रावल यांनी सांगितले. महाराष्ट्राकडे विविध कृषी-हवामान विभाग, मोठा शेतकरी व शेतकरी उत्पादक कंपन्यांचा समूह, विकसित बाजारपेठा, औद्योगिक परिसंस्था तसेच देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडणारी वाहतूक व्यवस्था असल्याचे मंत्री श्री रावल यांनी यावेळी अधोरेखित केले.

मंत्री श्री रावल म्हणाले, मॅग्नेटच्या पहिल्या टप्प्यात पायाभूत सुविधा आणि मूल्यसाखळी मजबूत करण्यासाठी उल्लेखनीय काम झाले आहे. या टप्प्यात दोनशे ऐंशीहून अधिक उपप्रकल्पांना पाठबळ देण्यात आले असून, सुमारे सत्तेचाळीस हजार मेट्रिक टन क्षमतेची शीतगृह व्यवस्था निर्माण झाली. क्षमताविकासाच्या माध्यमातून तेहतीस हजारांहून अधिक शेतकऱ्यांना लाभ झाला. सुमारे दोन लाख बत्तीस हजार शेतकऱ्यांवर थेट परिणाम झाला असून, त्यातील सुमारे त्रेचाळीस टक्के लाभार्थी महिला आहेत. मॅग्नेटअंतर्गत पिकांच्या नुकसानीत सुमारे आठ पूर्णांक त्र्याहत्तर टक्के घट झाली असून, सुमारे दोनशे पंच्याहत्तर कोटी रुपयांची खासगी गुंतवणूकही झाली. या माध्यमातून सुमारे चार हजार तीनशे थेट रोजगार निर्माण झाले असून, त्यातील अठ्ठेचाळीस टक्के रोजगार महिलांना मिळाले आहेत. मॅग्नेटच्या दुसऱ्या टप्प्यात एकात्मिक पायाभूत सुविधांवर भर देण्यात येणार आहे. 'मॅग्नेट २.०'साठी एकूण पंचवीस कोटी अमेरिकी डॉलर इतका निधी असून, यासाठी आशियाई विकास बँक आणि महाराष्ट्र शासनाचेही सहकार्य आहे. पहिल्या टप्प्यातील पंधरा मूल्यसाखळ्यांऐवजी दुसऱ्या टप्प्यात तेवीस मूल्यसाखळ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा लाभ चार लाखांहून अधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे, दोनशे शेतकरी उत्पादक कंपन्यांना सक्षम व विकसित करण्याचे तसेच एक लाख पंधरा हजार सदस्यांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.मॅग्नेट २.० अंतर्गत मोठ्या प्रमाणावर शीतसाखळी, कृषी-लॉजिस्टिक केंद्रे, प्रक्रिया व मूल्यवर्धन सुविधा, कृषीमालाचे एकत्रीकरण व प्रतवारी तसेच निर्याताभिमुख पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. या सहा उत्पादन समूहांसाठी सुमारे सहा लाख मेट्रिक टन वार्षिक हाताळणी क्षमता आणि एक लाख मेट्रिक टनांहून अधिक शीतगृह क्षमता निर्माण करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पांसाठी लवकरच स्वारस्य अभिव्योक्ती मागविण्यात येणार असून, प्रकल्प व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य आणि दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी आकर्षक कसे होतील, याबाबत उद्योग क्षेत्राच्या सूचना महत्त्वाच्या असल्याचे मंत्री श्री रावल यांनी सांगितले.

## इन्व्हेस्को म्युच्युअल फंडचे इन्व्हेस्को इंडिया निफ्टी इंडिया डिफेन्स इंडेक्स फंड आणि इन्व्हेस्को इंडिया निफ्टी केमिकल इंडेक्स फंड

■ मुंबई(दै. संध्या)

इन्व्हेस्को म्युच्युअल फंडाने आज इन्व्हेस्को इंडिया निफ्टी इंडिया डिफेन्स इंडेक्स फंड (निफ्टी इंडिया डिफेन्स इंडेक्सचे अनुकरण करणारी ओपन-एंडेड योजना) आणि इन्व्हेस्को इंडिया निफ्टी केमिकल इंडेक्स फंड (निफ्टी केमिकल इंडेक्सचे अनुकरण करणारी ओपन-एंडेड योजना) सुरू करण्याची घोषणा केली. भारतातील दीर्घकालीन संरचनात्मक आणि धोरणाधारित वाढीच्या प्रवाहांचा लाभ घेणाऱ्या दोन क्षेत्रांमध्ये सहभागी होण्याची संधी या योजना गुंतवणूकदारांना देतात.

ट्रॅकिंग एररच्या अधीन राहून, इन्व्हेस्को इंडिया निफ्टी इंडिया डिफेन्स इंडेक्स फंड निफ्टी इंडिया डिफेन्स इंडेक्सच्या रचनेची प्रतिकृती तयार करून इक्विटी आणि इक्विटी-संबंधित सिक्युरिटीजमध्ये पॅसिव्ह गुंतवणूक करेल. भारताच्या संरक्षण परिसंस्थेचा अविभाज्य भाग असलेल्या कंपन्यांना हा इंडेक्स एक्सपोजर प्रदान करतो, ज्यामध्ये एरोस्पेस आणि संरक्षण उत्पादक, संरक्षण इलेक्ट्रॉनिक्स कंपन्या, जहाज बांधणी कंपन्या, स्फोटक उत्पादक आणि संबंधित व्यवसायांचा समावेश आहे.

ट्रॅकिंग एररच्या अधीन राहून, ही योजना बेंचमार्कच्या कामगिरीनुसार परतावा मिळवण्याच्या प्रयत्नाने, निफ्टी इंडिया डिफेन्स इंडेक्सचे घटक असलेल्या कंपन्यांमध्ये इंडेक्सच्या समान वेटेजमध्ये गुंतवणूक करेल. इनव्हेस्को इंडिया निफ्टी केमिकल इंडेक्स फंड हा निफ्टी केमिकल इंडेक्सच्या रचनेचे अनुकरण करून इक्विटी आणि इक्विटी-संबंधित सिक्युरिटीजमध्ये ट्रॅकिंग एररच्या अधीन राहून 'पॅसिव्ह' गुंतवणूक करेल. निफ्टी केमिकल इंडेक्समध्ये स्पेशालिटी केमिकल्स, ॲग्रोकेमिकल्स, कमोडिटी केमिकल्स, खते, औद्योगिक वायू, स्फोटके आणि संबंधित क्षेत्रांतील कंपन्यांचा समावेश आहे; यामुळे भारताच्या रासायनिक क्षेत्रातील विविध उप-क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्याची संधी मिळते. निफ्टी केमिकल इंडेक्सचा भाग असलेल्या कंपन्यांमध्ये, त्या इंडेक्समधील त्यांच्या भारांकानुसार ही योजना गुंतवणूक करेल. ट्रॅकिंग एरर विचारात घेऊन, बेंचमार्कच्या कामगिरीशी सुसंगत परतावा मिळवणे हे या योजनेचे उद्दिष्ट असेल. संरचनात्मक सुधारणा, वाढती देशांतर्गत मागणी, उत्पादन-क्षेत्रावर आधारित विकास आणि धोरणात्मक तसेच औद्योगिक स्वावलंबनावर दिलेला विशेष भर यामुळे भारताच्या विकासाची वाटचाल अविरत सुरू आहे. वाढता संरक्षण खर्च, स्वदेशीकरणाचे उपक्रम आणि निर्यातीच्या वाढत्या संधींचा लाभ संरक्षण क्षेत्राला मिळतो आहे; तर दुसरीकडे, वाढता देशांतर्गत वापर, मूल्य-वर्धित उत्पादन आणि जागतिक पुरवठा साखळीतील विविधता यांचा रासायनिक क्षेत्राला फायदा होत आहे.

## पतसंस्थेच्या कारभारात पारदर्शकता आवश्यक: प्रा. लक्ष्मण मंडलिक



■ नारायणगाव (दै. संध्या)

पतसंस्थेच्या संचालक मंडळाने संस्थेत काम करताना पदाधिकारी म्हणून नव्हे, तर सभासदांच्या पैशांचे विश्वस्त म्हणून काम करणे आवश्यक आहे. चुकीचे आर्थिक व्यवहार झाले तर पतसंस्था सहकारातून नव्हे, तर समाजातूनच नष्ट होण्यास वेळ लागणार नाही, असा इशारा सहकारी संस्थांचा प्रदीर्घ अनुभव असलेले प्रा. लक्ष्मण मंडलिक यांनी दिला.

नारायणगाव येथील अमरम ज्योती पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी त्यांनी पतसंस्थांच्या कारभारातील जबाबदारी, आर्थिक शिस्त, कर्जवाटप आणि कर्मचारी व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

प्रा. मंडलिक म्हणाले, सध्याच्या काळात कर्ज बुडविण्यासाठी विविध क्लृप्त्या करणाऱ्या सराईत टोळ्या निर्माण झाल्या आहेत.

कोणाचे कर्ज कसे घ्यायचे, कोणाच्या बोजावर दुसरा बोजा कसा दाखवायचा, मॉर्गेज कसे करायचे आणि कर्जाची रक्कम मिळालीच नाही, असे सांगून कर्जफेड टाळण्याचे प्रकार केले जात आहेत. त्यामुळे पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी कर्जवाटप व वसुलीमध्ये अत्यंत दक्षता बाळगणे गरजेचे आहे.

## कर्मयोगी शंकररावजी पाटील (भाऊ) यांच्या २० व्या पुण्यतिथीनिमित्त मान्यवरांचे भावपूर्ण अभिवादन




■ इंदापूर(दै. संध्या)

माजी खासदार श्रद्धेय कर्मयोगी शंकररावजी बाजीराव पाटील (भाऊ) यांच्या २० व्या पुण्यतिथीनिमित्त विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेऊन भावपूर्ण अभिवादन केले. इंदापूर येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील कर्मयोगी भाऊंच्या समाधी स्थळी महाराष्ट्र राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, राष्ट्रीय सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे तसेच संस्थेचे संचालक व युवा नेते राजवर्धन पाटील यांनी उपस्थित राहून आदरांजली वाहिली.

याप्रसंगी कर्मयोगी परिवार, संस्थेचे सचिव, सर्व संचालक मंडळ, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाधी स्थळावर नारायणदास रामदास संगीत विद्यालयाच्या भजनी मंडळाने सुश्राव्य भजन सादर केले.

या स्मृतिदिनानिमित्त श्री नारायणदास रामदास प्रशालेत प्रसिद्ध शिवव्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांच्या 'चला संस्कार जपुयात' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

त्यांनी शिवचरित्र आणि सद्यस्थितीतील सामाजिक पैलूंवर प्रकाश टाकत संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी सविस्तर विचार मांडले.

## नारायणगाव महाविद्यालयात 'भारतीय राष्ट्र' विषयावर विशेष व्याख्यान

■ नारायणगाव (दै. संध्या)



ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव आणि ३६ महाराष्ट्र बटालियन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रनिर्मिती : माझा अभिमान माझी जबाबदारी "Indian Nation – Our Pride, Our Responsibility" या विषयावर प्रेरणादायी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ, शैक्षणिक नेतृत्वकर्ता व प्रेरणादायी वक्ते प्रा. डॉ. अश्विन कुमार भारद्वाज उपस्थित होते. तसेच ब्रुकर इंडिया सायंटिफिक प्रायव्हेट लिमिटेडचे रीजनल मॅनेजर कर्नाटक बेंगलोरचे सेल्स श्री. प्रकाश सिद्दाप्पा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी होते. तसेच महाविद्यालयाचे मानसशास्त्र विभाग प्रमुख व एनसीसीचे ए. एन.ओ. कॅप्टन डॉ. दिलीप शिवणे यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमामुळे महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्समध्ये राष्ट्रप्रेम, जबाबदारी, नेतृत्व, आत्मपरीक्षण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन याबाबत प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. अश्विन कुमार भारद्वाज यांनी आपल्या प्रभावी आणि संवादात्मक मार्गदर्शनातून कॅडेट्सना "देश बदलण्यापूर्वी स्वतःमध्ये बदल घडवून आणणे आवश्यक आहे" हा विचार दिला. राष्ट्रनिर्मिती ही केवळ सरकारची किंवा सैनिकांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाच्या विचारांपासून आणि कृतींपासून राष्ट्राची निर्मिती होत असते, असे त्यांनी स्पष्ट केले. कॅडेट्सचा सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी त्यांनी भाषणाऐवजी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून संवाद साधला. सदभावना म्हणजे काय?", "तुम्ही दुसऱ्या व्यक्तीशी बोलण्यापूर्वी किती विचार करता?", "तुम्ही कधी तुमच्या अंतर्मनाचा आवाज ऐकता का?", "तुमच्या स्वतःच्या विषयापलीकडे जाऊन तुम्ही कधी दुसऱ्याचा विचार करता का?", "तुम्ही एखाद्या व्यक्तीला तिच्या दिसण्यावरून किंवा स्वभावावरूनच की वर्तनावरून ओळखता का?" अशा प्रश्नांनी त्यांनी कॅडेट्सना स्वतःच्या विचारसरणीचे आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त केले.

# गणेश मंडळाच्या समोर आरतीच्यावेळी डेंग्यू ,चिकनगुन्या आजाराबाबत जनजागृती

■ पिंपरी (दै. संध्या)

मानवी हक्क संरक्षण आणि जागृती व मनपा आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवी सांगवी, पिंपळे गुरव परीसरात डेंग्यू,चिकनगुन्या आजाराबाबत संध्याकाळी सात ते नऊ वेळात दररोज पाच मंडळामध्ये स्पीकरद्वारे, माहितीपत्रक वाटून डेंग्यू चिकनगुन्या आजाराची जनजागृती करण्यात आली. डेंग्यू आजार होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी आणि झाल्यावर त्यावरील उपाय योजनांची माहिती स्वतः शहराध्यक्ष आण्णा जोगदंड हे स्पीकरमधून गणेश भक्तांना देत आहेत, ही जनजागृती अनंत चतुर्थी पर्यंत चालणार असल्याचे जोगदंड यांनी सांगितले.

आरोग्य निरीक्षक स्नेहल सोनवणे म्हणाल्या कि डेंग्यू आजार म्हणजे डंक छोटा, धोका मोठा, त्यामुळे हिवताप, डोकेदुखी, अंगावर लालसर रंग येणे,तीव्र पाठ दुखी,पुरळ उठणे असे लक्षणे दिसून आल्यास डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे त्यांनी आव्हान केले.

प्लास्टिक न वापरण्याची व पर्यावरण रक्षणाची गणेश भक्तांना जोगदंड यांनी यावेळी शपथ दिली. आज महाराष्ट्र मित्र मंडळ ,समतानगर मित्र मंडळ,सत्ता प्रतिष्टान, शिव प्रतिष्ठान, शिवराय मित्र मंडळ याठिकाणी जनजागृती घेण्यात आली.यावेळी जनजागृती मोहीमेत शहराध्यक्ष आण्णा जोगदंड, आरोग्य निरीक्षक स्नेहल सोनवणे, नगरसेविका दीप्ती कांबळे,बेसिक टीमचे पवन रंधे, महाराष्ट्र मित्र मंडळाचे अध्यक्ष मनीष भापकर,मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीच्या पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा संगीता जोगदंड, कार्याध्यक्ष मुरलीधर दळवी,समतानगर मित्र मंडळ उत्सव समिती धीरज बारणे उपाध्यक्ष अनिरुद्ध बारणे सचिव अक्षय कुंभार . केदार घोरपडे, मनोज मदने,तेजस पाटील, अखिल देसाई सत्ता प्रतिष्ठानचे अध्यक्ष



सौरभ शिंदे, सत्ता प्रतिष्ठानचे अध्यक्ष सौरभ शिंदे, शिवप्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत माटुर,उपाध्यक्ष अविनाश इंदलकर, कार्याध्यक्ष विशाल नाथबोने, सचिव निलेश गाडेकर, प्रसाद पवार,शिवराया मित्र मंडळाचे अध्यक्ष रोहित भिसे, रोहित राऊत सा. का.शिवानंद तालीकोटी, वसंत मांडे, ह भ प अशोक ढोरे, सा.का. दीपक गायकवाड महाराष्ट्र मित्र मंडळाचे उपाध्यक्ष दीपक गायकवाड खजिनदार राजेश साळुंखे तसेच विजय इंगळे,मेल्विन मेंड्रोस,मनोज जगताप,संदीप बर्गे,निखिल जगताप,संदीप बर्गे,कुलदीप गुजर,सचिन बर्गे,ध्रुविल भिलारे मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पुरंदर तालुक्यातील दौंडज येथे वीरच्या म्हस्कोबा मंदिराची उभारली प्रतिकृती

**जेजुरी : दैनिक संध्या**

सर्वत्र गणेश उत्सवाची धामधूम सुरू असून सार्वजिक मंडळा बरोबरच घरी बसविलेल्या गणपती समोर सजावट करण्याची क्रेझ वाढली आहे. पुरंदर तालुकातील दौंडज येथील कदम वस्तीवर आशुतोष कदम या तरुणाने थर्माकोलचा वापर करून वीर येथील प्रसिद्ध असणाऱ्या म्हस्कोबा मंदिराची आकर्षक प्रतिकृती साकारली आहे. हा देखावा पाहण्यासाठी नागरिक गर्दी करीत आहेत.

### जेजुरी पोलिस स्टेशन हद्दीत 258 सार्वजनिक मंडळांनी केली श्री गणेशाची प्रतिष्ठापना

**जेजुरी : दैनिक संध्या**

जेजुरी पोलिस स्टेशन हद्दीतील विविध गावातील 258 सार्वजनिक मंडळांनी केली श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली.तर जेजुरी शहरात ४४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी केली प्रतिष्ठापना केली आहे.ग्रामीण भागातील पाच गावांत एक गाव एक गणपती ही संकल्पना राबविण्यात आली आहे. दिनांक 14 रोजी खूप थाटामाटात आणि धार्मिक वातावरणात जेजुरी व परिसरात गणरायाचे आगमन झाले.भाविकांच्यात मोठा उत्साह पाहण्यास मिळाला. जेजुरी पोलिस स्टेशन हद्दीतील तक्रारवाडी ,टेकवडी ,सुकलवाडी ,आंबळे ,पिसे आदी गावांमध्ये एक गाव एक गणपती ही संकल्पना राबविण्यात आली आहे. दरम्यान ,पोलीस प्रशासन विशेषतः जेजुरी पोलीस ठाण्याच्या वतीने गंणेशोत्सव साजरा करताना ,अंमली पदार्थ विरोधी व पर्यावरण संवर्धन ,महिला व बाल सुरक्षा ,सायबर सुरक्षा व नागरिक दक्षता ,मंडप ,ध्वनी व लेझर बंदी बाबत आचारसंहितेची मार्गदर्शक मूलतत्वे ,आणि जनजागृती माहिती पत्रकांचे वितरण करण्यात येत असून गणेशोत्सव मंडळांनी धार्मिक व मंगलमय वातावरणात शांततेत ,सुरक्षित व शिस्तीत उत्सव साजरा करावा असे आवाहन करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील ,सहा.पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार यांनी दिली . पोलीस प्रशासनाने घालून दिलेली आचार संहिता ,व मार्गदर्शक मूलतत्त्वे यांचे पालन करीत धार्मिक ,मंगलमय वातावरणात तसेच शांतता ,शिस्तीमध्ये समाजभिमुख उपक्रम राबविणाऱ्या आणि डीजे डॉल्बीला फाटा देत पारंपरिक वाद्यांमध्ये मिरवणूक काढणार्या गणेश मंडळांना दादा फाऊंडेशनच्या वतीने नगराध्यक्ष जयदीप बारभाई ,जेजुरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक रवींद्र पाटील , उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांचे हस्ते आदर्श मंडळ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे तसेच एक गाव एक गणपती संकल्पना राबविणाऱ्या मंडळांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती फाउंडेशनचे कार्यवाह शिवराज झगडे ,नगरसेवक रमेश लेंडे , माजी नगराध्यक्ष रोहिदास कुंभार यांनी दिली.

### वेधशाळा भेटीतून विद्यार्थ्यांना विज्ञानाची अनुभूती

**नारायणगाव: दैनिक संध्या**

कुरण येथील जयहिंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉम्युनिकेशन इंजिनिअरिंग आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी एका विशेष शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी प्रसिद्ध खगोलशास्त्रीय वेधशाळेला भेट देऊन विज्ञानाचे थेट प्रात्यक्षिक अनुभवले. या अभ्यास दौऱ्या दरम्यान विद्यार्थ्यांना वेधशाळेतील विविध अत्याधुनिक सुविधा, यंत्रसामग्री आणि खगोलशास्त्रात वापरल्या जाणाऱ्या प्रगत तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती मिळाली. वेधशाळेचे वैज्ञानिक सहाय्यक निलेश पोखरकर यांनी विद्यार्थ्यांना दोन मीटर ऑप्टिकल टेलिस्कोपची कार्यपद्धती समजावून सांगत सखोल मार्गदर्शन केले. यामुळे विद्यार्थ्यांना वैज्ञानिक संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेता आल्या. आधुनिक वैज्ञानिक उपकरणांची कार्यपद्धती जवळून पाहिल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण होण्यास मदत झाली. या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानात मोलाची भर पडली असून, विज्ञान व तंत्रज्ञानाचा मानवी जीवनातील उपयोग आणि त्याचे महत्त्व अधिक दृढ झाले आहे. ही शैक्षणिक भेट यशस्वी करण्यासाठी जयहिंद शैक्षणिक संकुलाच्या संचालिका डॉ. एस. डी. गुंजाळ, प्राचार्य डॉ. ए. बी. उबाळे,मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डी. एस. गल्हे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच प्रा.डॉ. व्ही. एम. धेडे व प्रा. एस. ई. शिंदे यांचे विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन लाभले. या संपूर्ण उपक्रमाचे नेटके संयोजन औद्योगिक भेटीचे समन्वयक प्रा. एस. डी. चौगुले व प्रा. एस. एस. लोहोटे यांनी केले होते. तसेच कॉलेजचे सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी ही भेट यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

### पाण्याच्या वादातून नातेवाईकावर जीवघेणा हल्ला; दोघांना एक वर्षाचा कारावास

**जुन्नर : दैनिक संध्या**

सामाईक विहिरीचे पाणी व पाईपलाईनवरून झालेल्या वादातून नातेवाईकाला लाकडी दांडक्याने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी जुन्नर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दोघांना दोषी ठरवत एक वर्षाच्या साध्या कारावासाची व दंडाची शिक्षा सुनावली. न्यायदंडाधिकारी नम्रता महादेव बिरादार यांनी १६ सप्टेंबर रोजी हा निकाल दिला. बबन लक्ष्मण पिंगट (वय ६७) व देविदास बबन पिंगट (वय ४१, दोघे रा. बेल्हे, ता. जुन्नर) अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत. बेल्हे येथील गट क्रमांक २११ मधील सामाईक विहिरीच्या पाण्यावरून हा वाद झाला होता. २३ फेब्रुवारी २०१९ रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास फिर्यादी हरिदास नागू पिंगट यांच्या पाण्याची पाळी असताना आरोपींनी पाणी सुरू ठेवल्याने वाद झाला. फिर्यादी यांच्या पत्नीने हरकत घेतल्यानंतर आरोपींनी शिवीगाळ केल्याचा आरोप होता. वाद सोडविण्यासाठी गेलेल्या हरिदास पिंगट यांना आरोपी बबन पिंगट यांनी गळा पकडून जमिनीवर पाडले, तर देविदास पिंगट याने लोखंडी खोऱ्याच्या लाकडी दांडक्याने त्यांच्या पाठीवर व पायावर मारहाण केली. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडले होते. याप्रकरणी आळेफाटा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे कामी सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता अनुप ल. लखोटीया यांनी सहा साक्षीदार, वैद्यकीय अहवाल तसेच जप्त मुद्देमाल न्यायालयासमोर सादर केला. साक्षीदारांची साक्ष आणि वैद्यकीय पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने दोन्ही आरोपींना भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अंतर्गत दोषी ठरविले.

# २० बाय २० फुटांच्या रांगोळीतून पंतप्रधान नरेंद्र मोदींना शुभेच्छा

## ७६ व्या वाढदिवसानिमित्त प्रल्हाद गवळी मित्र परिवाराकडून ७६ दिवे पेटवत, ७६ किलो पेढ्यांचे वाटप करत आनंदोत्सव



**पुणे (दै. संध्या)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त रविवार पेठेतील संत नामदेव चौकात २० फूट बाय २० फूट आकाराची भव्य रांगोळी काढून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. लोककल्याण प्रतिष्ठान, प्रल्हाद गवळी मित्र परिवार आणि भाजप पुणे शहर यांच्या वतीने आयोजित या उपक्रमात ७६ दिवे पेटवून आणि ७६ किलो पेढ्यांचे वाटप करून वाढदिवसाचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

रविवार पेठेतील संत नामदेव चौकात काढण्यात आलेल्या भव्य रांगोळीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. रांगोळीच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. नागरिकांनी रांगोळीचे कौतुक करत उपक्रमाला प्रतिसाद दिला. ही रांगोळी पाच दिवस पुणेकरांना पाहता येणार आहे. या उपक्रमास नगरसेवक राजेंद्र काकडे, भाजप राष्ट्रीय लीगल सेल कमिटीचे सदस्य ॲड. हिरसिंग राजपुरोहित, मंडल अध्यक्ष छगन बुलाखे, सरचिटणीस माधव साळुंके, अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष सुनील खंडागळे, उपाध्यक्ष प्रशांत बढाई, अजय बढाई, विलास सिन्नरकर, साईनाथ चकोर, प्रशांत बल्ला, आदेश अवघडे, सोनाली थोपटे, विकास गवळी, विक्रम लगड आदी उपस्थित होते.

“वाढदिवसाच्या निमित्ताने २० फूट बाय २० फूट आकाराची रांगोळी काढून आनंदोत्सव साजरा केला. ७६ दिवे पेटवून आणि ७६ किलो पेढे वाटून नागरिकांसोबत हा आनंद द्विगुणित झाला. वाढदिवस केवळ औपचारिक न ठेवता सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमातून साजरा करण्याचा आमचा प्रयत्न आहे. नागरिकांचे प्रेम, सहकार्य आणि उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा उपक्रम संस्मरणीय ठरला,” अशी भावना आयोजक प्रल्हाद गवळी यांनी व्यक्त केली. 'मूर्ती तुमची, किंमत तुमची' या उपक्रमांतर्गत नुकतेच पाच हजार गणपती मूर्तींचे वाटप करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

## मंडळांच्या माध्यमातून शासकीय योजनांची जनजागृती

**बारामती (दै. संध्या)**

**माहिती व जनसंपर्क विभागाचा अभिनव उपक्रम**

गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती नागरिकांपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने ‘लोकसंवाद-२०२६’ या विशेष जनजागृती अभियान २४ सप्टेंबर पर्यंत राबविण्यात येणार आहे. शासकीय यंत्रणांनी व गणेश मंडळानी या उपक्रमात सहभागी होऊन शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येत असल्याने या व्यासपीठाचा उपयोग शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती व्यापक स्वरूपात पोहोचविण्यासाठी करण्यात येत आहे. नागरिकांशी थेट संवाद साधणे, योजनांची माहिती देणे आणि पात्र लाभार्थ्यांना संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. महिलांसाठीच्या कल्याणकारी योजना, बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरणाच्या संधी तसेच बालकांच्या सर्वांगीण विकासासाठीच्या योजनांचा पात्र नागरिकांनी लाभ घ्यावा, याबाबतही मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

‘लोकसंवाद-२०२६’ अंतर्गत गणेश मंडळांच्या ठिकाणी संबंधित विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी नागरिकांशी थेट संवाद साधणार असून, योजनांची अधिकृत आणि सविस्तर माहिती या माध्यमातून मिळणार आहे.

नागरिकांच्या प्रश्नांना संबंधित विभागाच्या प्रतिनिधींकडून थेट उत्तरे मिळत असल्याने योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शनही उपलब्ध होत आहे. पुणे शहरासह जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधील गणेश मंडळांमध्ये ‘लोकसंवाद’ कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. कृषी, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, आरोग्य, कौशल्य विकास, सहकार, सायबर सुरक्षा यासह विविध विभागांच्या योजना आणि उपक्रमांची माहिती या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

## शरयू साखर कारखाना बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा उत्साहात

### २०२६-२७ गाळप हंगामासाठी कारखाना सज्ज; प्रतिदिन ११ हजार मे.टन गाळपाचे नियोजन

**कापशी (फलटण) (दै. संध्या)**



शरयू साखर कारखाना लि., कापशी येथे आगामी २०२६-२७ गाळप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बारावा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा बुधवार,दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला . कारखान्याचे कार्यकारी संचालक मा.श्री.युगेंद्र (दादा) पवार यांच्या शुभहस्ते बॉयलरचे अग्निप्रदीपन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कारखान्याच्या प्रगतीसह आगामी गाळप हंगाम निर्विघ्नपणे पार पडावा,कारखान्यास तसेच ऊस उत्पादक शेतकरी,कर्मचारी, कामगार व संबंधित सर्व घटकांना भरभराट लाभावी,यासाठी संचालक श्री.अविनाश भापकर व सौ.कमल भापकर यांच्या हस्ते विधिवत पूजा व होमहवन करण्यात आले.

आगामी २०२६-२७ गाळप हंगामासाठी शरयू साखर कारखान्याची गाळप क्षमता वाढविण्यात आली असून, यंदाच्या हंगामात कारखाना सरासरी प्रतिदिन ११ हजार मे.टन ऊस गाळप क्षमतेने कार्यरत राहणार आहे. वाढीव गाळप क्षमतेमुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार असून,उपलब्ध ऊस वेळेत व कार्यक्षम पद्धतीने गाळप करण्यास मदत होणार आहे. कारखाना प्रशासनाने आगामी हंगामासाठी यंत्रसामग्री,तांत्रिक व्यवस्था, मनुष्यबळ तसेच विविध विभागांची आवश्यक तयारी पूर्ण करण्यावर भर दिला आहे. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना कार्यकारी संचालक मा. श्री.युगेंद्र दादा पवार यांनी आगामी गाळप हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने आणि जबाबदारीने काम करण्याचे आवाहन केले. ऊस उत्पादक शेतकरी हा कारखान्याच्या कार्याचा केंद्रबिंदू असून, शेतकऱ्यांचा ऊस वेळेत व सुरळीतपणे गाळप होण्यासाठी कारखाना व्यवस्थापन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. कारखान्याची वाढलेली गाळप क्षमता,आधुनिक तांत्रिक व्यवस्था आणि सर्व विभागांचा समन्वय यांच्या माध्यमातून आगामी हंगामात विक्रमी गाळप होईल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमास युनिट हेड श्री. सुरेश पाटील यांच्यासह कारखान्याचे सर्व वरिष्ठ विभागप्रमुख,उपविभागप्रमुख, अधिकारी,कर्मचारी व कामगार बांधव,ऊस उत्पादक शेतकरी, पुरवठादार तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कारखान्यातील सर्व विभागांनी विशेष परिश्रम घेतले.आगामी गाळप हंगामाच्या प्रारंभी झालेल्या या बॉयलर अग्निप्रदीपन सोहळ्यामुळे कारखाना परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, २०२६-२७ च्या गाळप हंगामासाठी शरयू साखर कारखाना पूर्ण क्षमतेने सज्ज झाला आहे.

## तरुण त्वचारोगतज्ज्ञ डॉ. अवधूत खबाले यांची आत्महत्या

### पितृशोकातील मानसिक तणावातून टोकाचे पाऊल उचलल्याचा संशय



**इंदापूर (दै. संध्या)**

इंदापूर शहरातील अंबिकानगर परिसरात वास्तव्यास असलेले २९ वर्षीय उदयोन्मुख त्वचारोगतज्ज्ञ डॉ. अवधूत विठ्ठल खबाले यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना आज, गुरुवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. या दुर्दैवी घटनेमुळे इंदापूर शहर सुन्न झाले असून संपूर्ण वैद्यकीय वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे. डॉ. अवधूत खबाले हे अल्पवधीतच आपल्या अभ्यासू वृत्तीने आणि नम्र स्वभावाने परिसरात निष्णात व लोकप्रिय डॉक्टर म्हणून ओळखले जाऊ लागले होते. मात्र, अवघ्या दोन महिन्यांपूर्वीच त्यांच्या वडिलांचे निधन झाले होते. या पितृशोकाच्या दुःखातून ते बाहेर पडू शकले नव्हते. प्रचंड मानसिक तणावाखाली असल्यानेच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज नातेवाईकांकडून व्यक्त केला जात आहे.

गुरुवारी सकाळी साडेसातच्या सुमारास ही घटना निदर्शनास आली. मेडिकल व्यावसायिक प्रताप छगन खबाले यांना त्यांचे बंधू डॉ. शिवाजी खबाले यांनी दूरध्वनीवरून याची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी इंदापूर पोलिसांच्या मदतीने डॉ. अवधूत यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले; परंतु तपासणीअंती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले.

या प्रकरणी इंदापूर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास साहाय्यक पोलीस निरीक्षक भारत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहेत.

## स्वच्छता ही सेवा अभियानात ४५० जणांचे श्रमदान

**आळंदी (दै. संध्या)**



स्वच्छ भारत अभियान २.०, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), स्वच्छ सर्वेक्षण २०२६ व माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत ‘स्वच्छता ही सेवा २०२६’ महास्वच्छता अभियानाचा शुभारंभ आळंदीतील सिद्धबेट येथे करण्यात आला. या अभियानात विविध शैक्षणिक व सामाजिक संस्थांमधील विद्यार्थी, प्रतिनिधी तसेच आळंदी नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत श्रमदान केले. या उपक्रमात सात शैक्षणिक व सामाजिक संस्थांमधील ३७० विद्यार्थी व प्रतिनिधी, तसेच आळंदी नगरपरिषदेचे ८० कर्मचारी, असे एकूण ४५० जण सहभागी झाले. सहभागी विद्यार्थ्यांनी सिद्धबेट परिसरात स्वच्छता करून स्वच्छतेचा संदेश दिला. अभियानात ज्ञानसाई शाळेचे ४५, महात्मा फुले शिक्षण संस्थेचे १५, नगरपरिषद शाळा क्र. १ चे ११०, दुरपे विद्यालयाचे ३०, ध्यास फाउंडेशनचे २०, ज्ञानेश्वर विद्यालयाचे ८० आणि ज्ञानगंगा संस्थेचे ७० विद्यार्थी व प्रतिनिधी सहभागी झाले.

## जेजुरी नगरीत गौरींचे आगमन सजावटीची धामधूम



**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या श्रीक्षेत्र खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत श्री गणेशाच्या बरोबरच गौरींचे आगमन झाल्याने सर्वत्र उत्साहाचे,आनंदाचे वातावरण आहे. जेजुरी शहरात पूर्वी पासून गौरीच्या स्वागता बरोबरच गौरी समोर धार्मिक सामाजिक,सांस्कृतिक विषयांवर आकर्षक सजावट गृहिणी वर्ग करीत असतात. फळा फुलांची तसेच फराळाची उत्कृष्ट सजावट, धार्मिक, सामाजिक विषयावर देखावे सादर केले जातात. या सजावटीची धामधूम जेजुरीत पाहण्यास मिळाली. जेजुरी नगरीत सार्वजनिक गणेश उत्सवात देखाव्याची परंपरा कमी झाली असून त्याही अनेक वर्षांपासून घरोघरी महिला वर्ग गौरीच्या आगमना निमित्त विविध विषयावर सजावट करीत आहेत. प्राचीन मंदिरे, जेजुरी खंडोबा पालखी सोहळा, पर्यावरण, वृक्षारोपण, मुलगी वाचवा, आदी विषयावर देखावे साजरे करत असतात. याही वर्षी महिला वर्ग या सजावटीत रममाण झाल्या आहेत. गुरुवार दिनांक 17 रोजी सायंकाळी 7.55 गौरी बसविण्याचा मुहूर्त असल्याने दिवसभर गौरींची प्रतिष्ठापना जेजुरी शहरात पाहण्यास मिळाला.

जेजुरी येथील सुषमा राऊत,प्रियंका राऊत यांनी गौरी गणपती उत्सवा निमित्त टाकाऊ वस्तू पासून पौराणिक मंदिराचा देखावा, फुलांची आकर्षक सजावट केली आहे.



## ओझोनचा थर पृथ्वीचे सुरक्षा कवच

**ओतूर (दै. संध्या)**

**प्रा. अंकुश मोधे**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब वाघिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या वतीने जागतिक ओझोन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख व्याख्याते प्रा. अंकुश मोधे यांनी विद्यार्थ्यांना ओझोन थराचे पर्यावरणीय महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभागाचे प्रा. डॉ. ए. टी. पाडवी यांनी केले. वाढते औद्योगिकीकरण, प्रदूषण आणि आधुनिक जीवनशैलीचा पर्यावरणावर होणारा परिणाम त्यांनी अधोरेखित केला. प्रा. अंकुश मोधे यांनी ओझोन थराला ‘पृथ्वीचे सुरक्षा कवच’ संबोधत सूर्याच्या अतिनील किरणांपासून मानवासह संपूर्ण जीवसृष्टीचे संरक्षण करण्यात ओझोनची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे सांगितले. प्रदूषण, वृक्षतोड तसेच क्लोरोफ्लोरोकार्बन (CFC) वायूच्या उत्सर्जनामुळे ओझोन थराचे नुकसान होत असल्याने पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने जबाबदारीने योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी हवामान बदल, अनियमित पर्जन्यमान, अतिवृष्टी, दुष्काळ आणि हिमनग वितळणे यांसारख्या पर्यावरणीय समस्यांवर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करून वृक्षारोपण, प्लास्टिकचा मर्यादित वापर, सायकलचा वापर आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. के. डी. सोनावणे, डॉ. विनायक कुंडलिक, मराठी विभागप्रमुख डॉ. वसंत गावडे, हिंदी विभागप्रमुख डॉ. राजेश रसाळ, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.संदिपान गव्हाळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. निलेश काळे यांनी केले, तर आभार डॉ. रमेश गोपाळे यांनी मानले.